मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in    E mail - dainikyuvakaadhar@gmail.com    facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १६५ ■ रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## महामार्गावर टोलवसुली होणार कॅशलेस; १ एप्रिलपासून अंमलबजावणीचे संकेत

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण येत्या १ एप्रिलपासून राष्ट्रीय महामार्गावरील टोल नाक्यांवर रोख रक्कम स्वीकारणे पूर्णपणे बंद करण्याचा विचार करत आहे. यानुसार प्रवाशांना टोल भरण्यासाठी फक्त डिजिटल पद्धतींचा ‘फास्टॅग’, ‘यूपीआय’चा वापर करावा लागेल.

प्राधिकरणाने म्हटले की, अंमलबजावणीनंतर राष्ट्रीय महामार्गावरील सर्व टोल देयके केवळ डिजिटल माध्यमांतूनच स्वीकारली जातील. देशभरातील सर्व टोल नाक्यांवर रोख व्यवहार पूर्णपणे बंद करून संपूर्णपणे डिजिटल टोलिंग प्रणाली विकसित करण्याचा प्राधिकरणाचा मानस आहे.

इलेक्ट्रॉनिक टोल संकलन प्रणालीत झालेल्या प्रगतीला अधिक बळ देणे आणि टोल नाक्यांच्या कार्यपद्धतीत कार्यक्षमता व विश्वासार्हता वाढवणे, हा या प्रस्तावित निर्णयामागील उद्देश असल्याचे स्पष्ट केले. या बदलामुळे वाहनचालकांसाठी ‘ईज ऑफ कम्प्युटिंग’ सुधारेल, लेनमधील वाहनांची गती वाढेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल तसेच व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता आणि सुसंगतता येईल.

गेल्या काही वर्षांत ‘फास्टॅग’ चा वापर ९८ टक्क्यांहून अधिक वाहनांपर्यंत पोहोचला असून त्यामुळे देशातील टोल वसुली पद्धतीत मोठा बदल झाला आहे. सध्या बहुतांश टोल व्यवहार टोल नाक्यांवर ‘यूपीआय’द्वारे आणि सुलभ डिजिटल देयकाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियमांनुसार, वैध व कार्यरत ‘फास्टॅग’ नसलेल्या वाहनांना टोल नाक्यावर रोख रक्कम भरल्यास दुप्पट शुल्क आकारले जाते, तर ‘यूपीआय’द्वारे देयक करणाऱ्या वाहनचालकांकडून संबंधित वाहन श्रेणीसाठी लागू असलेल्या शुल्काच्या १.२५ पट रक्कम आकारली जाते. राष्ट्रीय महामार्ग व द्रुतगती मार्गांवरील १,१५० हून टोल नाक्यांवर डिजिटल देयक प्रणाली लागू झाल्यास कार्यक्षमता वाढेल.

# सिंहस्थ कुंभमेळा 2027: 'कुंभदूत' एजेंटिक AI ॲप 20+ भाषांमध्ये भाविकांना मार्गदर्शन करणार

**नाशिक :** 'इंडिया AI इम्पॅक्ट समिट 20236 'मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'कुंभदूत' या एजेंटिक AI आधारित संकल्पनेचं सादरीकरण करण्यात आलंय. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे 2027 मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात (Nashik Simhastha Kumbh Mela 2027) येणाऱ्या कोट्यवधी भाविकांना सोयीस्कर, वैयक्तिक आणि बहुभाषिक सहाय्य मिळावं या उद्देशानं ही क्रांतिकारी संकल्पना विकसित करण्यात आली आहे. ही प्रणाली व्हॉइस-फर्स्ट, गोपनीयता जपणारी आणि डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरवर आधारित आहे, ज्यामुळं डिजिटल साक्षरता नसलेल्या वयोवृद्ध भाविकांनाही याचा फायदा होईल.




**एजेंटिक कुंभ**

'एजेंटिक कुंभ' या मॉडेलअंतर्गत प्रत्येक नोंदणीकृत भाविकाला स्वतःचा वैयक्तिक AI एजंट 'कुंभदूत' (Kumbhadoot agen_tic AI app) मिळेल. हा कुंभदूत भाविकाच्या वतीनं काम करेल. प्रवास मार्गदर्शन, निवास व्यवस्था, घाटांची माहिती, आपत्कालीन मदत, डिजिटल पेमेंट (यूपीआयद्वारे), भाषांतर आणि इतर सेवांमध्ये समन्वय साधेल. ही प्रणाली शासन विभाग, आरोग्य सेवा, वाहतूक आणि स्थानिक व्यापाऱ्यांशी जोडलेली असेल, परंतु सर्व कृती भाविकाच्या संमतीनं आणि गोपनीयतेसह होईल. कोणताही केंद्रीकृत डेटाबेस तयार केला जाणार नाही; माहिती मर्यादित कालावधीसाठीच वापरली जाईल.

**बहुभाषिक आणि सर्वसमावेशक सेवा**

'कुंभदूत' 20 पेक्षा अधिक भारतीय भाषांमध्ये (Kumbhadoot AI app) कार्य करेल. स्मार्टफोन, फीचर फोन किंवा अगदी IVR (इंटरॅक्टिव्ह व्हॉइस रिस्पॉन्स) प्रणालीद्वारे कॉल करूनही सेवा उपलब्ध होईल. सोप्या आवाजाच्या माध्यमातून माहिती मिळेल, ज्यामुळं भाषेची अडचण, माहितीचा अभाव किंवा गर्दीतील गोंधळ कमी होईल. 'कुंभ पास' ही ऐच्छिक सुविधा डिजीलॉकरमध्ये सुरक्षित साठवली जाईल, ज्यामुळं प्रवेश, सेवा आणि आपत्कालीन मदत सुलभ होईल.

**पायलट प्रकल्प आणि स्केलेबिलिटी**

सिंहस्थपूर्वी नाशिकमधील महाविद्यालयांमध्ये 10 हजार सहभागींसह पायलट प्रकल्प राबवला जाईल. ही प्रणाली 1 कोटीपर्यंत भाविक आणि लाखो डिजिटल एजंट्स हाताळण्यास सक्षम असेल. कुंभमेळा प्राधिकरण अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी सांगितलं की, ही यंत्रणा नियंत्रणासाठी नव्हे, तर समन्वय आणि सेवा वितरणासाठी आहे. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनीही भाषेच्या अडचणी दूर होण्याबाबत भर दिला.

**श्रद्धा आणि तंत्रज्ञानाचा संगम**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, एजेंटिक कुंभ संकल्पनेमुळं महाराष्ट्र जबाबदार आणि नैतिक AI वापरात आघाडी घेईल. श्रद्धा आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुंदर संगम साधून जगातील सर्वात मोठ्या शांततापूर्ण धार्मिक मेळाव्याचं नियोजन अधिक प्रभावी होईल. गोपनीयता जपत एकत्रित मागणी संकेतांवर आधारित अचूक नियोजन शक्य होईल.

**कुंभदूत' एजेंटिक AI संकल्पनेची प्रमुख वैशिष्ट्ये**

- प्रत्येक नोंदणीकृत भाविकासाठी वैयक्तिक एआय सहाय्यक
- 20 पेक्षा अधिक भारतीय भाषांमध्ये आवाजावर आधारित सेवा
- स्मार्टफोन, फीचर फोन (कॉल) आणि किऑस्कद्वारे उपलब्धता
- ऐच्छिक ‘कुंभ पास’ – डिजीलॉकरमध्ये सुरक्षित साठवण
- यूपीआयद्वारे सोपी डिजिटल पेमेंट सुविधा
- प्रवास, निवास, घाट, आरोग्य व आपत्कालीन मदत मार्गदर्शन
- शासन विभाग, आरोग्य सेवा व व्यापाऱ्यांशी डिजिटल समन्वय
- गोपनीयता जपणारी, संमतीवर आधारित प्रणाली
- सिंहस्थपूर्व 10 हजार जणांसह पायलट प्रकल्प

# संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल शिराळा येथे विज्ञानप्रेमी विद्यार्थ्यांसाठी भव्य विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**गेवराई/प्रतिनिधी :** संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल शिराळा येथे विज्ञानप्रेमी विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेले भव्य विज्ञान प्रदर्शन उत्साहपूर्ण वातावरणात व जल्लोषात पार पडले. विद्यार्थ्यांच्या कल्पकता, जिज्ञासा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे उत्कृष्ट दर्शन या प्रदर्शनातून घडले.

या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून भगतसिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भिसे वाघोली येथील प्राचार्य कदम अंगद जगन्नाथ उपस्थित होते. तसेच शिंदे महेश श्रीकिसन (विज्ञान शिक्षक) व बचाटे दत्तात्रय त्र्यंबक (गणित शिक्षक) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात




मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली.विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सौरऊर्जा, पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन, रोबोटिक्स, दिवस-रात्र चक्र, चंद्रग्रहण व सूर्यग्रहण तसेच विविध गणितीय मॉडेल्स यांसारखे नाविन्यपूर्ण व अभ्यासपूर्ण प्रकल्प सादर केले. प्रत्येक प्रकल्पामागील वैज्ञानिक तत्त्वे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने स्पष्ट केली. विशेषतः सौरऊर्जा व पर्यावरण संवर्धन या विषयांवरील प्रकल्पांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले.विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातील बारकावे, सर्जनशीलता आणि विषयावरील पकड पाहून उपस्थित मान्यवरांनी त्यांचे मनापासून कौतुक केले. यावेळी मुख्याध्यापक देशमुख सर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, “विज्ञान प्रदर्शन हे केवळ प्रकल्प मांडण्याचे व्यासपीठ नसून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जिज्ञासा आणि संशोधन वृत्ती विकसित होते.”प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेचे शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.हा विज्ञान प्रदर्शन सोहळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी, ज्ञानवर्धक आणि संस्मरणीय ठरला.




**चुंबळी फाटा, ता.पाटोदा जि.बीड येथे शिवाजीराव गोरे यांच्या डी.जी.सोलार एंटरप्राईजेस च्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित राहुन शुभेच्छा देताना. आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नय्युम भाई पठाण, रिपाईचे पाटोदा तालुकाध्यक्ष डॉ.नरेंद्र जावळे व खोपटी ग्राम पंचायतचे माजी सरपंच रामराव तोटे सह इतर...**

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

# रविवारी कबड्डी स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्ष निमित्ताने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलवेनोडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी २०२६ स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा रविवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ०६ वाजता पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या समारंभाचे अध्यक्ष म्हणून पनवेल



महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील यांची तर अर्जुन पुरस्कार विजेते शकुंतला खटावकर, अर्जुन पुरस्कार विजेते अभिलाषा म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल जवळील रामशेठ ठाकूर मैदानावर होत असलेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील १८८ पुरुष कबड्डी संघ आणि ३२ महिला संघ सहभागी झाले आहेत. शुक्रवारी सुरु झालेल्या या स्पर्धेत खेळाडूंकडून चमकदार कामगिरी पहायला मिळत आहे. रविवारी स्पर्धेचा अंतिम दिवस असून त्याच दिवशी सायंकाळी पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

तरी या स्पर्धेचा कबड्डी रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह चित्राताई पाटील, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, स्पर्धा संयोजन समितीचे सचिव शरद कदम यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये शिर्डी साईबाबांच्या पवित्र पादुकांचे दर्शन सोहळा भक्तिपूर्ण वातावरणात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेलमधील श्री साई मंदिरात १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान शिर्डी येथील श्री साईबाबांच्या पवित्र पादुकांचे दर्शन सोहळा अत्यंत आध्यात्मिक आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या तीन दिवसांच्या सोहळ्याने संपूर्ण पनवेल शहर भक्तीच्या रसात न्हाऊन गेले. सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून पादुकांचे दर्शन घेतले. आमदार ठाकूर म्हणाले की, पनवेलकरांच्या अफाट श्रद्धेचा अनुभव या सोहळ्यादरम्यान पाहायला मिळाला.हजारो भाविकांनी एकरूप भक्तीने दर्शन घेतले, तसेच प्रार्थना करून साईबाबांच्या चरणी मनःपूर्वक शरणागतीची अनुभूती घेतली.

सोहळ्याची सुरुवात १८ फेब्रुवारी रोजी श्री साईबाबांच्या पादुकांचे विधीवत स्वागत करून झाली. या दिवशी संपूर्ण



शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. भाविकांच्या सोयीसाठी सकाळी ७ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत अखंड दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. हजारो भाविकांनी या संधीचा लाभ घेतला. सोहळ्याच्या अंतिम दिवशी, २० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजेपर्यंत दर्शन घेता आले आणि त्यानंतर पवित्र पादुका शिर्डीकडे रवाना झाल्या. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने साईभक्त उपस्थित होते. या सोहळ्यामुळे पनवेलकरांच्या श्रद्धेची उजळणी झाली आणि शहरात भक्तिपूर्ण वातावरण निर्माण झाले. सोहळ्यात उपस्थित भक्त आणि मान्यवरांनी सांगितले की, या दर्शनाने त्यांना जीवनातील सर्व अडचणींवर मात करण्यासाठी साईबाबांची कृपा मिळते, आणि मनामध्ये आध्यात्मिक शांती व श्रद्धेची अनुभूती होते.

या तीन दिवसांच्या भक्तिमय सोहळ्यामुळे पनवेल परिसर संपूर्णपणे साईबाबांच्या आशीर्वादाखाली भक्तिपूर्ण वातावरणाने न्हालेलं दिसले.

# राज्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे यांची कुंदेवाडी येथील कृषी संशोधन केंद्रास भेट



**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड येथील कृषी संशोधन केंद्र शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असून महाराष्ट्रातील उत्कृष्ट संशोधन केंद्रांपैकी एक

असल्याचे प्रतिपादन राज्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी केले. म.फु. कृ.वि.राहुरीचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे व संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमानिमित्त मांढरे यांनी कुंदेवाडी येथील कृषी संशोधन केंद्रास भेट देऊन संशोधन केंद्रातील विविध उपक्रमांची पाहणी केली. भेटीदरम्यान केंद्राने विकसित केलेल्या गव्हाच्या विविध सुधारित वाणांची सविस्तर माहिती घेतली. अधिक उत्पादन देणारा, कमी कालावधीत येणारा, तांबेरा रोगास प्रतिकारक तसेच बुटका व न लोळणारा 'फुले समाधान' या लोकप्रिय वाणाबाबत त्यांनी विशेष रस दाखवला. या वाणाचे क्षेत्र वाढत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. कमी पाण्यात येणारे, उशिरा पेरणीसाठी उपयुक्त व उच्च पोषणयुक्त (बायो-फोर्टिफाइड) वाणांबाबतही माहिती घेतली. बिस्किट उद्योगासाठी उपयुक्त 'फुले सात्विक' या वाणाच्या व्यावसायिकीकरणासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. गहू पिकावरील तांबेरा रोगाविषयी माहिती घेत संशोधनाची दिशा व बीज उत्पादन कार्यक्रमाबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी राष्ट्रीय पातळीवरील शास्त्रज्ञांच्या उपस्थितीत केंद्रात सुरू असलेल्या संशोधन व बीजोत्पादन कार्याची पाहणी केली. संशोधन, व्यवस्थापन व परिसर पाहून कृषी आयुक्तांनी समाधान व्यक्त केले. यावेळी डॉ.प्रमोद रसाळ (माजी संचालक शिक्षण व गहू विशेषज्ञ), संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा.भालचंद्र म्हस्के, डॉ.निलेश मगर, प्रा.संजय चितोडकर, डॉ.भरत मालुंजकर, राजेश लोखंडे, बाळू झडे कृषी विभागाच्या वतीने विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने, प्रकल्प संचालक (आत्मा) अभिमन्यू काशिद, उपविभागीय कृषी अधिकारी भटू पाटील, तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार आदी अधिकारी उपस्थित होते.

## इंदापूर तालुका प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटनेची आढावा बैठक

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुका प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटनेच्या वतीने आज आढावा बैठक भवानीनगर येथे पार पडली. या बैठकीस पुणे जिल्हा अध्यक्ष मा.शरद जाधव साहेब व जिल्हा उपाध्यक्ष मा.सुभाष इंगोले साहेब प्रमुख उपस्थित होते.

बैठकीदरम्यान जिल्हा अध्यक्षांनी दिव्यांग बांधवांना मोलाचे मार्गदर्शन केले. संघटनेची ताकद वाढवण्यासाठी तालुका पदाधिकाऱ्यांनी अतोनात प्रयत्न करावेत,असे आवाहन त्यांनी केले. या बैठकीस जिल्हा खजिनदार किसन भांगे, इंदापूर तालुका अध्यक्ष अनंतराव गायकवाड,तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब जामदार,तालुका सचिव रामदास चव्हाण,तालुका प्रसिद्धी अध्यक्ष ज्ञानदेव कांबळे,तालुका खजिनदार भारत शेंडे,तालुका कोषाध्यक्ष पोपट दराडे,तालुका संपर्क प्रमुख महेश्वर जगताप, तालुका सहखजिनदार ईनुस शेख,महिला अध्यक्ष सुक्षला ढाणे,महिला उपाध्यक्ष रुपाली जगताप,महिला कार्याध्यक्ष शोभा शिंगाडे तसेच संजय भोसले,संतोष बंडगर,सोमनाथ भोसले,दादा





गायकवाड,सोमनाथ कदम, क्षिरसागर,सुरज केचे,नवनाथ यमगर,दत्तात्रय पानसरे,सतीश बोराटे,शरद हरिहर,नंदकुमार जामदार आदी मान्यवर उपस्थित होते.बैठकीच्या शेवटी इंदापूर तालुक्याच्या वतीने आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

# संजय राऊत यांची दिलगिरी; दादा भुसे यांनी बदनामीचा खटला घेतला मागे!

**नाशिक :** गेल्या अनेक दिवसांपासून राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरलेल्या १७८ कोटींच्या शेअर्स घोटाळयाच्या आरोपाप्रकरणी आज नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. शिवसेना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत आज मालेगाव न्यायालयात हजर झाले. त्यांनी दिलगिरी व्यक्त केल्यानंतर शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी बदनामीचा खटला मागे घेतला आहे. संजय राऊत यांनी 'सामना'तून मंत्री दादा भुसे यांच्यावर गिरणा साखर कारखान्याच्या व्यवहारात १७८ कोटींचा अपहार केल्याचा खळबळजनक आरोप केला होता. मात्र, आज न्यायालयात हजर राहण्यापूर्वी राऊत यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. अद्वय हिरे यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे आपण हे आरोप केले होते. परंतु, वस्तुस्थिती पाहता आपण ते आरोप मागे घेत आहोत,असे राऊत यांनी जाहीर केले. राजकारणात अनेकदा माहितीच्या आधारे आरोप केले जातात. दादा भुसे यांच्याबद्दलची माहिती अद्वय हिरे यांनी दिली होती. त्या माहितीनुसार मी भूमिका मांडली होती, पण आता मी ते सर्व आरोप मागे घेत असून त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करत असल्याचे राऊत यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

यापूर्वीच्या सुनावणीला गैरहजर राहिल्यामुळे न्यायालयाने राऊत यांना एक हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. आजच्या सुनावणीवेळी राऊत स्वतः न्यायालयात हजर राहिले. सदरहू माहिती शिवसेना शिंदे गटाचे तत्कालीन उपनेते अद्वय हिरे यांनी दिली होती. या माहितीमध्ये कोणतीही सत्यता नसल्याचे नुकतेच माहित झाले. त्यामुळे सदरहू बदनामीकारक बातमीमुळे फिर्यादी तसेच गिरणा कारखान्याचे शेतकरी, सभासद यांच्या भावना दुखविल्या गेल्या,असे म्हणत संजय राऊत यांनी यांनी न्यायालयात दिलगिरी व्यक्त केली. तसेच राऊत यांनी गिरणा कारखान्याचे सभासद आणि शेतकरी यांची सत्यबाजू सामना वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे न्यायालयात मान्य केले. त्यानंतर भुसे यांनी बदनामीचा खटला मागे घेतला. तत्पूर्वी येथील शासकीय विश्रामगृहात शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख संजय दुसाने, सुनील देवरे आदी नेते व राऊत यांच्यात चर्चा झाली. त्यानंतर भुसे व राऊत हे न्यायालयात सोबतच गेले.

## होळीपूर्वी मनरेगा मजुरांना दिलासा; ६७ कोटींचा निधी मंजूर

### वाढीव लेबर बजेटलाही केंद्राची मान्यता - मनरेगा आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू/संपादक**
**नागपूर विभाग** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. मेळघाट, पालघर तसेच इतर आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये मजुरांना काम देताना वाढीव लेबर बजेट मंजुरीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन असल्याने काही कालावधीपासून मजुरी अदा करणे प्रलंबित होते. आदिवासी बांधवांचा होळी सण नजीक आल्याने राज्य शासनाने मजुरांना दिलासा देत तातडीने मजुरी अदा करण्यासाठी ६७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

संबंधित निधीची देयके कोषागाराकडे सादर करण्यात आली असून पुढील दोन ते तीन दिवसांत मजुरांच्या खात्यात थेट मजुरी जमा होणार आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात मजुरांना आर्थिक आधार मिळणार आहे. याशिवाय, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्र शासनाने राज्याच्या १३ कोटी मनुष्यदिवसांच्या लेबर बजेटमध्ये वाढ करून सुधारित १६ कोटी मनुष्यदिवसांच्या लेबर बजेटला मान्यता दिली आहे.

वाढीव मंजुरीमुळे मार्चअखेरपर्यंत मजुरांना नियमित रोजगार उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला असून मजुरी वेळेत अदा केली जाणार असल्याची माहिती मनरेगा आयुक्त, नागपूर डॉ. भरत बास्टेवाड यांनी दिली. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे आदिवासी व ग्रामीण भागातील हजारो मजुरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव स्वीकारणे सुरु

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी**
**चिखली/श्री सिद्धार्थ धंदरे** : बी एस एफ बहुद्देशीय संस्था व समाज प्रतिबिंब बहुद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पुरस्कार सोहळा मे महिन्यात नाशिक मधें चित्रपट सृष्टीतील दिग्गज कलाकारांच्या उपस्थिती मध्ये पार पडणार आहे. सामाजिक, कला, राजकीय, शिक्षण, पर्यावरण, पत्रकारिता, उद्योग, क्रीडा, व विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या लोकांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार



देऊन सन्मानित करण्यात येईल. या पुरस्कारासाठी प्रस्ताव स्वीकारणे सुरु असून आपला प्रस्ताव 9420621994 या नंबर वर पाठवावा.महाराष्ट्रातील केवळ ७० लोकांना महाराष्ट्र नायक या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक भूषण सरदार आहेत.

# १४ वर्षांची सेवा, अजूनही नाही हक्क!"; महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटनाचा २४ फेब्रुवारी २०२६ रोजी विधान भवनवर लक्षवेधी एल्गार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण**
**रायगड** : राज्यातील सुमारे २०,००० ग्रामपंचायत संगणकपरिचालकांनी आता हक्कासाठी निर्णायक लढ्याचा इशारा दिला आहे. १४ वर्षांपासून ग्रामीण महाराष्ट्रातील सुमारे ७ कोटी जनतेला सेवा देणाऱ्या संगणकपरिचालकांना आजही कर्मचारी दर्जा आणि किमान वेतन मिळालेले नाही. या अन्यायाविरोधात महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटनाच्या वतीने येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान २४ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईतील विधान भवनावर भव्य लक्षवेधी आंदोलन करण्यात येणार आहे. हजारो संगणकपरिचालक या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती राज्याध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे यांनी दिली.

**१४ वर्षांची सेवा... तरीही तुटपुंजे मानधन**

ग्रामविकास विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या संग्राम (संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्र) व आपले सरकार सेवा केंद्र या प्रकल्पांद्वारे राज्यातील सुमारे २८,५०० ग्रामपंचायतींमध्ये २०,००० संगणकपरिचालक कार्यरत आहेत. मात्र केवळ १०,००० रुपये मासिक मानधनावर त्यांना काम करावे लागत आहे. तेही अनेकदा ५-६ महिने उशिरा मिळते.

महागाईच्या झळा सहन करत कुटुंबाचा गाडा चालवणे कठीण झाले असल्याने संगणकपरिचालकांमध्ये तीव्र असंतोष आहे.

प्रमुख मागण्या

१) यावलकर समितीच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन.

२) तोपर्यंत शासनाच्या निधीतून ७,००० रु. वाढ करून मानधन १७,००० रु. करणे.

३) कायमस्वरूपी नोकरी सुरक्षा व कंत्राटी कामगारांप्रमाणे सर्व लाभ.

४) प्रत्येक ग्रामपंचायतीस नवीन संगणक, प्रिंटर व आवश्यक साहित्य पुरवणे.

५) महिला संगणकपरिचालकांना मानधनासह प्रसूती रजा.

६) किमान ५० लाख रुपयांचा अपघाती व आरोग्य विमा आश्वासनांची पेरणी, निर्णय मात्र नाही

शासनाकडून वारंवार लेखी व तोंडी आश्वासने देण्यात आली, मात्र प्रत्यक्षात कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.




"सेवा आमची, जबाबदारी आमची; मग हक्क का नाही?" असा संतप्त सवाल संगणकपरिचालक उपस्थित करत आहेत.

आता निर्णायक लढा

२४ फेब्रुवारी रोजी राज्यभरातील हजारो संगणकपरिचालक मुंबईतील आझाद मैदानावर एकत्र येत विधान भवनावर लक्षवेधी आंदोलन करणार आहेत. शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

१४ वर्षांची सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या मागण्या आता दुर्लक्षित राहू शकत नाहीत. ग्रामीण प्रशासनाचा कणा असलेल्या संगणकपरिचालकांना न्याय मिळणार का? — हा प्रश्न आता शासनासमोर उभा ठाकला आहे.

# नरसिंह विद्यामंदिर उमरदरी केंद्रात कॉपी प्रकरण; शिक्षणाधिकाऱ्यांचा दणका

**नरसिंह विद्यामंदिर उमरदरी केंद्राच्या कॉफी प्रकरणामुळे कॉपी मुक्ती अभियानास गालबोट लागले**
**परीक्षे दरम्यान पर्यवेक्षकांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे शिक्षणाधिकाऱ्यांचा दणका**

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : नांदेड- नरसिंह विद्यामंदिर उमरदरी ता. मुखेड परिक्षा केंद्रावर बारावी परीक्षे दरम्यान केंद्रावरील नऊ पर्यवेक्षकांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे व विद्यार्थ्यांना तपासून हॉलमध्ये सोडणारे सदरील शाळेचे चार कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे शिक्षणाधिकारी माध्य. नांदेड यांनी कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागितला

नरसिंह विद्या मंदिर ता. मुखेड हे केंद्र मास कॉफीसाठी जिल्ह्यात प्रसिद्ध असून कॉप्या करता येतात म्हणूनच या शाळेत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी प्रवेश घेतात. शाळेतील व्यवस्थापनाने कॉपी करण्यास विद्यार्थ्यांकडून 15 ते 20 हजार रुपये जमा केले. त्यामुळे 2026 च्या परीक्षेचे या केंद्राला मान्यता देऊ नये असे लेखी निवेदन सदरील शाळेच्या संस्थेचे आजीव सभासद सखाराम कुलकर्णी यांनी परीक्षा मंडळ लातूर व जिल्हाधिकारी नांदेड यांना दिले होते. भौतिकशास्त्राच्या परीक्षेच्या दिवशी दिलीप कुमार बनसोडे शिक्षणाधिकारी (योजना) यांनी या केंद्राला भेट दिली असता कॉपी करताना दोन विद्यार्थी आढळून आले व बऱ्याच विद्यार्थ्यांच्या खिशात गाईडची पानं आढळून आलीत. या केंद्रावरील पर्यवेक्षक कर्तव्यात कसूर करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. जिल्हादक्षता समितीने वारंवार आवाहन करून देखील पर्यवेक्षकांनी गैरप्रकाराला आळा घातला नाही.या केंद्रामुळे



जिल्ह्याच्या संपूर्ण परीक्षा प्रक्रियेस नाहक गालबोट लागले. परीक्षा सुरू होण्यापूर्वी परीक्षार्थींना तपासून आत सोडणारे जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या माजी सचिव निलाबाई शिंदे, शिक्षक टी. एस. वननाळे, आर. जी. गलांडे, प्राचार्य एस. पी. देशपांडे यांनी पारदर्शकपणे परीक्षार्थींची तपासणी केली नाही. तसेच पर्यवेक्षकांनी देखील त्यांना नेमून दिलेल्या पर्यवेक्षणीय कामात हयगयीने व बेजबाबदारपणाने वागले. परीक्षा केंद्रावरील सीसी टीव्ही बंद ठेवले. सीसीटीव्ही केवळ वर्ग खोल्यात लावण्यात आले. केंद्र संचालक बिल्लेवाड डी.एस. हे पण बेजबाबदार असल्याचे तपासणीला गेलेले श्री बनसोडे यांच्या निदर्शनास आले. श्री बनसोडे यांनी दिलेल्या अहवालावरून माधव सलगर शिक्षणाधिकारी माध्य. यांनी पर्यवेक्षक पदावर असलेले ए.पी. मुगटकर, एस. सी. वाघमारे, व्ही एच.खंदारे, एस. के. क्षीरसागर, जी.ए. गाडले, एल.एच. पाटील, श्रीमती पी. व्ही. लोहाळे, आर. आर. बिरादार व जी.बी. भरडे यांचे सह परीक्षार्थीयांची तपासणी करून सोडणारे श्रीमती निलाबाई शिंदे,डी.एस. वननाळे, आर.जी. गलांडे प्राचार्या एस. पी. देशपांडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. यांचे वागणे संशयास्पद असून परीक्षा नियमावलीला धरून नाही. कॉफी मुक्ती अभियान राबवण्याकडे दुर्लक्ष केले. बैठे पथक मध्ये असलेले एस. एस. मामीडवार ,नायब तहसीलदार मुखेड, आय. ए. सय्यद मंडळ महसूल अधिकारी, एन.जि. चिंचोरे,मद्देवाड एन. एल. कृषी सहाय्यक यांनी देखील कामात अत्यंत गंभीर चुका केल्या.दिलेल्या सूचनानुसार झूम वेबकास्ट ऑनलाईन शूटिंग प्रणालीवर संबंधित बैठे पथक सदस्य हजर नव्हतेच. यांचे विरुद्धही प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश या नोटीस द्वारे दिले. हि कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागवण्यात आला की संबंधित बैठे पथकातील सर्व सदस्य, तपासणी करणारे सर्व सदस्य व संबंधित पर्यवेक्षकांनी स्पष्ट लेखी स्वरूपात आपले म्हणणे नोटीस मिळताच तीन दिवसाच्या आत समक्ष सादर करावे.परीक्षेत कॉप्या करण्यास अडथळा येऊ नये म्हणुन कडक व शिस्तप्रिय असलेले ओमप्रकाश कल्याणकर यांना शिवाजी जाधव यांच्या भ्रष्ट व्यवस्थापनाने मुख्याध्यापक पदावरून हाटवले. त्यामुळेच परीक्षेत गैर प्रकार होत आहेत. शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेल्या नोटिशीला समाधान कारक खुलासा न आल्यास परीक्षा नियमावलीनुसार कायदेशीर, प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. या नोटिसीमुळे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व शिक्षणाधिकारी माध्यमिक नांदेड काय दणका देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सरकारी शाळा बंद करू नका; शाळा बंद म्हणजे भविष्याची हत्या!" – डॉं. प्रकाश कोटांगले

**दैनिक युवक आधार**



**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/ लाखनी भंडारा** : महाराष्ट्रातील कमी पटसंख्येच्या कारणावरून शाळा बंद करण्याच्या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत डॉ. प्रकाश कोटांगले यांनी हा निर्णय तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. "शाळा बंद करणे म्हणजे गोरगरीब, ग्रामीण व वंचित मुलांच्या भविष्यावर गंडांतर आणणे होय," असे ते म्हणाले.

महाराष्ट्र शासनाने संसाधनांचे एकत्रीकरण व कमी पटसंख्या ही कारणे पुढे केली असली तरी, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय अन्यायकारक ठरेल, असे डॉ. कोटांगले यांनी स्पष्ट केले. " लहान मुलांना ३-५ किमी अंतरावर शाळेत पाठवणे पालकांना परवडणार नाही. विशेषतः मुलींचे शिक्षण अर्धवट राहण्याचा धोका वाढेल," असा इशाराही त्यांनी दिला.डॉ. कोटांगले पुढे म्हणाले, "उपाय शाळा बंद करणे नाही, तर शाळा सक्षम करणे आहे. शिक्षक भरती, डिजिटल सुविधा, आणि विद्यार्थी वाहतूक व्यवस्था यांसारख्या ठोस उपाययोजना केल्यास शिक्षणाची गुणवत्ता वाढेल."

त्यांनी शासनाला लोभावना लक्षात घेऊन निर्णयाचा पुनर्विचार करण्याचे आवाहन केले. "शिक्षण हा अधिकार आहे,

# महावितरणचे आवाहन: फसव्या वीजबिल संदेशांपासून सावधान, अन्यथा बँक खाते रिकामे होईल!

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर** : महावितरणने वीज ग्राहकांना अनोळखी क्रमांकावरून येणाऱ्या वीजबिल भरण्यासंदर्भातील फसव्या संदेशांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे. सायबर हॅकर ग्राहकांची फसवणूक करण्यासाठी सक्रिय झाले असून, अशा संदेशांमुळे तुमचे बँक खाते रिकामे होऊ शकते, असा इशारा महावितरणने दिला आहे. कंपनीच्या वेबसाइटवर आणि ॲपवर या फसवणुकीपासून कसे वाचावे, याची सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

वीजबिल वसुलीची मोहीम सुरू असतानाच, सायबर गुन्हेगार पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. अनेक वीज ग्राहकांना 'तुमचे वीजबिल अपडेट नाही आणि आज रात्री वीजपुरवठा खंडित केला जाईल. त्वरित दिलेल्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधा,' अशा प्रकारचे बनावट संदेश येत आहेत. जर ग्राहकाने या क्रमांकावर संपर्क साधल्यास, त्यांना ऑनलाइन पेमेंटसाठी बनावट लिंक पाठवून सॉफ्टवेअर डाउनलोड करण्यास सांगितले जाते. असे केल्यास




मोबाइल किंवा संगणक हॅक होऊन बँक खात्यातील रक्कम लंपास होण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे अशा बनावट संदेशांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणकडून येणारे अधिकृत संदेश: महावितरण केवळ मोबाइल क्रमांकाची नोंदणी केलेल्या वीज ग्राहकांनाच अधिकृत संदेश पाठवते. यामध्ये पूर्वनियोजित देखभाल दुरुस्ती, तांत्रिक अडचणीमुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास लागणारा संभाव्य कालावधी, मासिक वीजबिलांची रक्कम, मीटर रीडिंग पाठवण्याचे आवाहन, मीटर रीडिंगची तारीख व वापरलेली युनिट संख्या, वीजबिलाची देय दिनांक आणि वीजपुरवठा खंडित करण्याची नोटीस, यांसारख्या माहितीचा समावेश असतो. महावितरण कधीही कोणत्याही अधिकाऱ्याच्या वैयक्तिक मोबाइल क्रमांकावर संपर्क साधण्यास सांगत नाही. वीजबिलाबाबत काही शंका किंवा तक्रारी असल्यास, ग्राहकांनी 24 तास सुरू असलेल्या टोल-फ्री क्रमांकावर किंवा नजीकच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**फसवणूक टाळण्यासाठी काय कराल?**

- महावितरण तुम्हाला कोणत्याही व्यक्तीशी संपर्क साधण्यास सांगत नाही.
- महावितरण केवळ VM-MSEDCL/VK-MSEDCL/AM-MSEDCL/JM-MSEDCL सारख्या SENDER ID वरूनच एसएमएस पाठवते. कोणत्याही वैयक्तिक मोबाइल क्रमांकावरून एसएमएस, व्हॉट्सॲप मेसेज किंवा ई-मेल पाठवले जात नाहीत. (SENDER ID मधील पहिली 2 अक्षरे ऑपरेटर आणि संदेश पाठवण्याचे ठिकाण दर्शवतात.)
- बिलाच्या पेमेंटसाठी कोणत्याही लिंकवर क्लिक करू नका किंवा कोणतेही सॉफ्टवेअर डाउनलोड करू नका.
- मेसेजमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही वैयक्तिक मोबाइल क्रमांकावर संपर्क साधू नका.
- ऑनलाइन पेमेंट करताना आपला मोबाइल किंवा डेस्कटॉप स्क्रीन किंवा मिळालेला ओटीपी कोणासोबतही शेअर करू नका.
- अशा फसवणुकीची तक्रार जवळच्या सायबर पोलिस स्टेशनमध्ये किंवा राष्ट्रीय सायबर क्राइम पोर्टल https://cybercrime.gov.in वर किंवा 1930 या हेल्पलाइनवर नोंदवा.
- अधिक माहितीसाठी 1912, 19120, 1800-212-3435 किंवा 1800-233-3435 या टोल-फ्री क्रमांकांवर संपर्क साधा.

# शामल श्यामसुंदर आंग्रे यांचा 75 वा वाढदिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**



**नवीन पनवेल वार्ताहर** : शामल शामसुंदर आंग्रे यांचा अमृत महोत्सवी सोहळा ज्येष्ठ नागरिक हॉल पनवेल येथे उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना 75 व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पनवेल येथील झिम पोरी झिम ग्रुपच्या वतीने विविध गाण्यांवर नृत्य करत उपस्थितांची मने जिंकली.यावेळी वैश्यवाणी रायगड जिल्ह्याचे माजी अध्यक्ष विलास मनोरे, उपाध्यक्ष दत्तात्रय तांबोळी, उदय मनोरे, शिक्षण सभापती महेश पोटे, विवाह समिती प्रमुख बापू दलाल, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष यशवंत गुर्जर, सर्व कमिटी मेंबर, सभासद, नवनिर्वाचित नगरसेविका ममता प्रीतम म्हात्रे, सुमित झुंजारराव, डोंबिवलीचे उद्योगपती डॉ. समीर जगे, जिल्हा संघाचे युवक अध्यक्ष मनोज आंग्रे, पनवेल वैश्य समाजाचे अध्यक्ष सुनील शेट्टे ,सर्व महिला कमिटी सभासद, मैत्रिणी, पत्रकार मयूर तांबडे, उमेश मनोरे प्रकाश मनोरे यांच्यासह अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# श्रीवर्धन येथे मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित** : शिवसेना शहर संघटना श्रीवर्धन आणि जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था महाराष्ट्र (रायगड विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन येथे मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले



होते. या भव्य आरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त व भरभरून प्रतिसाद लाभला. शिबिरामध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली तसेच गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. समाजोपयोगी या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांना आरोग्यसेवेचा थेट लाभ मिळाला.

नागरिकांनी दाखविलेला विश्वास, सहकार्य आणि सक्रिय सहभाग यामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल आयोजकांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले. समाजहिताचा हा प्रयत्न अधिक प्रभावी ठरण्यासाठी सर्व स्तरातून मिळालेल्या पाठिंब्याचे विशेष कौतुक करण्यात आले.भविष्यातही अशाच समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी नागरिकांचे सहकार्य व आशीर्वाद आवश्यक असल्याचे मत शिवसेना श्रीवर्धन शहर प्रमुख श्री.सावन तवसाळकर, यांनी व्यक्त केले.

# मोरेगांव येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/विठ्ठल काळे (सेलू)** : मोरेगांव ता.सेलू जि.परभणी येथील शिवजयंती निमित्त आज दिनांक 19 फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषदचे माजी सभापती संजय साडेगावकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद शाळेतील लहान मुलां-मुलींनी सहभाग घेऊन गावात प्रभात फेरी काढून शिवरायांचे नावाचा जयघोष करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जनार्दन आबा सोळंके,पंचायत समिती माजी सभापती जनार्धन आबा मगर,पंचायत समिती



सदस्य दिलीप नाना मगर, व गावातील सरपंच महादेव लोंढे, दैनिक युवक आधार प्रतिनिधी विठ्ठल काळे आदींची यावेळी उपस्थिती होती. यावेळी मोठ्या संख्येने गावकरी मंडळी उपस्थित होते.

# कार्यालयीन जबाबदारी समर्थपणे पेलण्यासाठी खिलाडूवृत्ती जोपासण्यावर भर द्या- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक युवक आधार**

**राकेश यादव वाडी नागपूर** : राज्यातील सुमारे 14 कोटी जनतेचा मालमत्तेचे रक्षण करण्याची जबाबदारी ही महसूल विभागावर आहे. नैसर्गिक आव्हानांपासून ते शासकीय पातळीवर आवश्यक असणाऱ्या सर्व महत्वपूर्ण दस्तऐवजीकरणाची जबाबदारी गावपातळीपासून जिल्हापातळीवरील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर सोपविण्यात आलेली आहे. आपल्याला देण्यात आलेले शासकीय कर्तव्य लोकाभिमुख व पारदर्शीपणे पूर्ण करता आले पाहिजे. कार्यालयीन कामे कालमर्यादेत होण्यासाठी वेळेचे प्रभावी व्यवस्थापनासमवेत खिलाडूवृत्ती जोपासणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.



रवी नगर येथील नागपूर विद्यापीठ क्रीडा संकुल येथे आयोजित विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, अपर आयुक्त डॉ.माधवी खोडे-चौरे, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, निवासी उपजिल्हाधिकारी अनूप खांडे, महसूल विभागातील सर्व वरिष्ठ अधिकारी, उपविभागीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांना अर्धन्यायिक अधिकार दिलेले आहेत. स्वाभाविकच सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा या वेळेत न्याय मिळावा यादृष्टीने असतात. यात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी प्रत्येकाला अधिकारांचे वाटप प्रशासनाने केले आहे. मोठ्या प्रमाणात आपण पदोन्नती दिल्या. यात एकाही अधिकाऱ्याला मंत्रालयात यावे लागले नसून त्यांच्या कामातील गुणवत्ता लक्षात घेऊन या पदोन्नत्या केल्याचे त्यांनी सांगितले. एखादा तहसिलदार हा महसूल विभागाच्या प्रमुख पदापर्यंत येण्याची सकारात्मकता तहसिलदारांनी बाळगणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. विविध नैसर्गिक आव्हानातून निर्माण झालेल्या परिस्थितीत शासनाच्या सकारात्मक प्रत्यय देण्यासह प्रत्येक व्यक्तीला शासनाच्या सकारात्मक प्रत्यय मिळावा यासाठी महसूल विभागातील अधिकारी-कर्मचारी सतत कर्तव्यतत्पर असतात. अतिवृष्टी असो, दुष्काळ असो, पाणीटंचाई असो, पिकपंचनामे असो सर्व पातळीवर महसूल विभागाला तत्पर राहावे लागते. या कार्यतत्परतेतूनच लोकाभिमूख प्रशासनाचा सर्वसामान्यांना प्रत्यय येतो. असंख्यवेळा महसूल विभागातील अधिकारी-कर्मचारी हे अत्यंत ताणतणावातून जात असतात. त्यावर जर मात करायची असेल तर क्रीडा कौशल्याची जोपासणा करुन आरोग्यासाठी थोडा वेळ काढण्याचे आवाहन विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले. स्पर्धेचा प्रारंभ ४०० मीटर धावणे या स्पर्धेपासून करण्यात आला. यावेळी नागपूर विभागातील पथसंचलनात नागपूर जिल्हा प्रथम, चंद्रपूर द्वितीय तर वर्धा जिल्हा तृतीय क्रमांकावर आला. 22 फेब्रुवारी चालणाऱ्या या स्पर्धेत तब्बल 1 हजार 250 वरीष्ठ अधिकारी कर्मचारी सहभाग घेणार आहेत. कबड्डी पासून हॉलीबॉलपर्यंत व बॅडमिंटन पासून टेबलटेनिस पर्यंत सुमारे 75 खेळांसाठी या स्पर्धा होत असून सुमारे 500 महिला अधिकारी कर्मचारी यांचा सहभाग आहे.

# माजी नगराध्यक्षा नफिसा बेगम यांचे निधन; पालकमंत्री सिरसाटांकडून सत्तारांचे सांत्वन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** : राज्याचे माजी मंत्री तथा सिल्लोडचे विद्यमान आमदार अब्दुल सत्तार यांच्या पत्नी आणि सिल्लोडच्या माजी नगराध्यक्षा नफिसा बेगम (वय ६०) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी (दि. १७) रोजी सिल्लोड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनानंतर राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी आमदार सत्तार यांची भेट घेऊन शोक व्यक्त केला असून, शुक्रवारी (दि. २०) रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय सिरसाट यांनी आमदार सत्तार यांची सांत्वन भेट घेतली.

नफिसा बेगम यांच्या निधनाचे वृत्त समजताच गेल्या काही दिवसांत राज्याच्या मंत्रिमंडळातील सदस्यांसह विविध दिग्गज नेत्यांनी सिल्लोड गाठून सत्तार परिवाराचे सांत्वन केले. यामध्ये प्रामुख्याने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, खासदार संदीपान भुमरे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, लोकमतचे एडिटर



इन चीफ तथा माजी मंत्री राजेंद्र दर्डा, आमदार प्रा. रमेश बोरणारे, आमदार संजना जाधव, जलसंधारण विभागाचे सचिव सुनील चव्हाण, माजी खासदार उत्तमसिंग पवार, माजी आमदार सुभाष झांबड, सांडू पा. लोखंडे, नामदेव पवार, श्रीक्षेत्र मुर्डेश्वर संस्थानचे पिठाधिश महंत ओंकारगिरी महाराज, छत्रपती संभाजीनगरचे उपमहापौर राजेंद्र जंजाळ, शिवसेना जिल्हा प्रमुख रमेश पवार, सेवानिवृत्त प्राचार्य नामदेवराव चापे आदी मान्यवरांचा समावेश आहे. या सर्व मान्यवरांनी आमदार सत्तार यांची भेट घेऊन नफिसा बेगम यांच्या स्मृतींना उजाळा दिला व या कठीण काळात सत्तार परिवाराच्या दुःखात सहभागी असल्याचे सांगितले.

# ओएनजीसी प्रकल्प गुजरातला?

## 600 कामगार रस्त्यावर येण्याची भीती, संतप्त निदर्शने

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरणमधील न्हावा येथे कार्यरत असलेला ओएनजीसी चा सप्लाय बेस प्रकल्प गुजरातमधील पिपावाव येथे हलविण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती समोर येताच कामगारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या निर्णयामुळे सुमारे 600 स्थानिक कामगार बेरोजगार होण्याची शक्यता व्यक्त होत असून, मंगळवारी कंपनीच्या प्रवेशद्वारावर जोरदार निदर्शने करण्यात आली.



जेएनपीए बंदरालगत 45 वर्षांपूर्वी उभारण्यात आलेला न्हावा सप्लाय बेस हा 'मुंबई हाय' येथील तेल व गॅस विहिरींसाठी अत्यंत महत्त्वाचा केंद्रबिंदू मानला जातो. सुमारे 100ते125किलोमीटर सागरी अंतरावर असलेल्या विहिरींपर्यंत अवजड यंत्रसामग्री, पाइप, सिमेंट व इतर साहित्य जहाजांद्वारे याच ठिकाणाहून पाठवले जाते. मात्र हा प्रकल्प गुजरातला हलविण्याचे निर्देश ओएनजीसीच्या नियोजन व परिवर्तन विभागाचे अध्यक्ष अजय कुमार सिंग यांनी दिल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. याच्या निषेधार्थ सुमारे 600 कामगारांनी कंपनीसमोर घोषणाबाजी करत केंद्र सरकारविरोधात रोष व्यक्त केला.

निर्णय घेण्यापूर्वी प्रशासनाने कामगारांशी चर्चा करावी, सर्वांच्या नोकऱ्यांची हमी द्यावी आणि स्थानिक रोजगारावर गदा येणार नाही, याची स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी ट्रान्सपोर्ट ॲण्ड डॉक वर्कर्स युनियनच्या वतीने करण्यात आली आहे. दरम्यान, या संदर्भात कंपनीकडून अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नसल्याने कामगारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. उरणमधील आणखी एक महत्त्वाचा प्रकल्प बाहेर जाणार का, या प्रश्नाने स्थानिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले

# नेरळ येथे पद्मश्री नारायण सुर्वे जन्मशताब्दी निमित्त साहित्य गौरव ग्रंथाचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते** : ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या जीवनकार्यावर आधारित 'कवी नारायण सुर्वे साहित्य गौरव ग्रंथ' याचे प्रकाशन जेष्ठ नागरिक सभागृह, नेरळ येथे उत्साहात संपन्न झाले.

या प्रसंगी ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "अनुभवाच्या मुशीतून तावून सुलाखून निघालेली नारायण सुर्वे यांची कविता माणसातील माणूस जिवंत करणारी आहे. त्यांच्या कवितेतून प्रखर संवेदना पाझरत राहते. समाजातील वंचित, कष्टकरी आणि उपेक्षितांच्या भावविश्वाला त्यांनी समर्थ शब्द दिले."

सदर ग्रंथाचे संपादन लेखक-साहित्यिक गिरीश कंटे यांनी केले असून, जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या या ग्रंथामध्ये विविध लेखक व साहित्यिकांनी लेखन केले आहे. प्रकाशन सोहळ्यात ग्रंथामध्ये लेखन करणाऱ्या सर्व लेखक-साहित्यिकांचा सन्मान करण्यात आला.यावेळी लेखक-साहित्यिक प्रसाद हनुमंते यांचाही सन्मान ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास रानकवी तुकाराम धांडे, प्रा. सुधीर घागस, पीपल्स पब्लिकेशनचे प्रकाशक प्रा. हरेंद्र सोस्टे, स्वातंत्र्य सैनिक गोमाजी रामा पाटील प्रतिष्ठानच्या संस्थापिका अनुसयाबाई जामघरे, नेरळचे माजी सरपंच सावळाराम जाधव तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे वातावरण साहित्यप्रेमींच्या उपस्थितीने भारावून गेले होते. नारायण सुर्वे यांच्या साहित्य वारशाचे जतन व संवर्धन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला

# कुर्ली येथे २५ फेब्रुवारीला भव्य 'विशाल हिंदू संमेलन'; समस्त गावकरी मंडळींचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर** : घाटंजी तालुक्यातील कुर्ली येथे आठवडी बाजार परिसरात बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी 'विशाल हिंदू संमेलना'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. समस्त हिंदू समाजाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात हिंदू जागृती, सनातन संस्कृतीचे जतन आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला जाणार आहे.

या संमेलनाचे उद्घाटन विदर्भ प्रांत समरसता गतीविधी प्रमुख मा. श्री. आनंदीदासजी पाळेकर यांच्या हस्ते होणार असून, आर्णी येथील महंत मा. श्री. योगेश महाराज पुरी हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करतील. तसेच आनंदमठ झाटाळा फाटा येथील श्री संत शाहपुरी महाराज यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १०:०० वाजता होईल. या निमित्ताने भव्य हिंदू जनजागरण रॅली काढण्यात येणार असून, यामध्ये कुर्ली, तरोडा, सायतखर्डा, कवठा खुर्द आणि झाटाळा परिसरातील विविध पुरुष व महिला भजनी मंडळे सहभागी होणार आहेत. दिवसभर चालणाऱ्या या भक्तीमय सोहळ्यानंतर सायंकाळी ५:०० वाजता सर्व भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी परिसरातील सर्व नागरिकांनी या धर्म कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक समस्त गावकरी मंडळी, कुर्ली यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आष्टी मध्ये डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन - मोठी गर्दी आणि उत्साह

## डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन शेती ज्ञानासोबतच मनोरंजनाचे केंद्र बनले; तिन दिवसांत ९० हजारांहून अधिक नागरीकांनी भेटू देऊन तंत्रज्ञानाची घेतली माहिती

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे** : आष्टी येथे शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या संकल्पनेतून डॉक्टर स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन सुरु असून पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाला तिसऱ्या दिवशीही शेतकरी, युवक, विद्यार्थी व नागरिकांची विक्रमी गर्दी पाहायला मिळाली. या कृषी प्रदर्शनाला तब्बल ९० हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी भेट देत आधुनिक शेतीविषयक माहिती, नव्या संकल्पना व तंत्रज्ञानाची माहिती घेतली आहे.शनिवारी सुट्टीचा दिवस असल्याने सकाळी आठ वाजल्यापासूनच शेतक गर्दी करण्यास सुरवात केली. माती विना शेतीचे प्रयोग, फळे शेती, डाळिंब, पेरू, आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रावर आधारित शेती, मार्गदर्शन व आधुनिक तंत्रज्ञान पाहून शेतकरी हरखून गेले होते.



आष्टी मतदार संघाचे मा. आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते, शेतकऱ्यांचे नेते भिमरावजी धोंडे यांनी ग्रामीण भागातील शेतकरी, लघु व मध्यम शेतकरी, युवक व महिला शेतकरी यांना डोळ्यासमोर ठेवून या प्रदर्शनाची रचना केली असून सलग तिसऱ्या वर्षी देखील कुठलीही शासनाची मदत न घेता स्वखर्चातून भव्य दिव्य शेतकऱ्यांचे बेरोजगारांचे हित डोळ्यासमोर ठेवून तिसऱ्या वर्षी देखील मोठ्या उत्साहात कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले असून यंदाच्या प्रदर्शनात शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या १५० हून अधिक नामांकित कंपन्यांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत.स्टॉल्सवर आधुनिक शेती यंत्रसामग्री ट्रॅक्टर व अवजारे, उच्च प्रतीची बी-बियाणे, खते व कीडनाशके ड्रिप व स्प्रिंकलर सिंचन प्रणाली, सोलर पंप, शेतमाल प्रक्रिया व मूल्यवर्धन यांची सविस्तर माहिती राज्यस्तरीय डॉ.स्वामीनाथन कृषी प्रदर्शनात शेतकऱ्यांना दिली जात आहे. या भव्य दिव्य प्रदर्शनामध्ये भव्य कमान प्रथमदर्शी स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब व अजित दादा पवार यांचे फोटो लक्ष वेधून घेत आहेत.प्रवेश केल्यानंतर भव्य अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा आकर्षक ठरत असून त्यापुढे गेल्यानंतर शंकराची तांडव मूर्ती सुसज्ज असे लाईट व सुशोभीकरण करण्यात आल्याने नागरिकांचा फोटो काढण्यासाठी मोह आवरत नसून मोठ्या प्रमाणावर कृषी प्रदर्शनास भेट देण्यापूर्वीच नागरिक फोटो काढण्यास गर्दी करत आहेत.स्टॉलची पाहणी केल्यानंतर नागरिकांसाठी खाऊ गल्ली उपलब्ध करण्यात आली असून प्रत्येक नागरिक खाऊगल्लीचा आस्वाद घेत आहे.व विद्यार्थ्यांसाठी मनोरंजन खेळणी उपलब्ध करण्यात आली आहे. व कृषी प्रदर्शनामध्ये सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांना च्या कलागुणांना वाव देण्यासाठी स्टेज उपलब्ध करून देण्यात आले असल्याने विद्यार्थ्यासह कलाकारांनी मा. आ. भीमराव धोंडे यांचे आभार मानले आहेत.

तरुण शेतकरी, महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद

कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी जिल्हाभरातून तसेच आष्टी तालुक्याच्या शेजारील अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी दाखल होत आहेत. गर्दीत येणाऱ्या शेतकऱ्यांना अडचण येऊ नये, म्हणून सूचना देऊन योग्य मार्गदर्शन आयोजक करत आहेत. सदर कृषी प्रदर्शन २३ फेब्रुवारी पर्यंत सुरु रहाणार असून, शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वतीने करण्यात आले आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दीमध्ये वाढ होत आहे. यामध्ये तरुण शेतकऱ्यांसह महिला वर्गांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

खाऊ गल्ली मुख्य आकर्षक

कृषी प्रदर्शनांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबतच खाऊ गल्ली हे मुख्य आकर्षण ठरत आहे. अस्सल देशी चवीचे पदार्थ, चटकदार भेळ, वडापाव आणि चायनीज, पिझ्झा अशा विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी खवय्यांची मोठी गर्दी होत आहे. हे प्रदर्शन शेती ज्ञानासोबतच मनोरंजनाचे केंद्र बनले आहे.

भव्य कृषी प्रदर्शनात आधुनिक तंत्रज्ञानासोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांची उत्तम मेजवानी

शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठीआयोजितकृषीमहोत्सवात तंत्रज्ञानासोबतच मनोरंजनाचाही धमाका पाहायला मिळाला. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी व आनंद शैक्षणिक संकुलातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून लोककला, लावणी, पोवाडे आणि शेतकऱ्यांच्या यशोगाथा सांगणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली

चायना चा सुलतान प्रमुख आकर्षक

डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनामध्ये चायनाचा सुलतान प्रमुख आकर्षक असून आलेल्या प्रत्येक नागरिक सुलतान पाहण्यासाठी मोठी गर्दी करत आहे .

# पत्रकार श्री डी. टी. आंबेगावे यांचा पन्हेळी–गायमुख गावाने केला विशेष सन्मान

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/तळा, रायगड** : स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून तळा तालुक्यातील पन्हेळी-गायमुख येथे सामाजिक कृतज्ञतेचा सोहळा पार पडला. यावेळी 'प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ' महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा 'सत्य पोलीस टाइम्स'चे मुख्य संपादक श्री. डी. टी. आंबेगावे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक आणि पत्रकारितेतील कार्याबद्दल सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.हा सोहळा गायमुख ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, बौद्धजन सेवा संघ आणि पंचशील महिला मंडळ (पन्हेळी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.श्री. डी. टी. आंबेगावे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारिता क्षेत्रात आपल्या लेखणीच्या माध्यमातून निर्भीडपणे लढा दिला आहे. केवळ बातम्या देणे एवढ्यापुरते



मर्यादित न राहता, पत्रकार, त्यांचे कुटुंबीय, गोरगरीब जनता, कष्टकरी वर्ग आणि विद्यार्थ्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या याच ध्येयवादी कार्याची दखल पन्हेळीतील विविध मंडळांनी घेतली. सन्मानपत्रात म्हटले आहे की, " लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारिता क्षेत्रात आपण बजावलेली सेवा व आपले समर्पण खरोखरच कौतुकास्पद आहे. सामाजिक प्रश्नांची जाण आपल्या निर्भीड वृत्तीमुळे समाजात अनेक महत्त्वाचे बदल घडून आले आहेत. आपल्या ध्येयवादी कार्याची दखल घेऊन कृतज्ञतापूर्वकहे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे." अशा भावना सन्मानपत्राद्वारे व्यक्त करण्यात आल्या. शिवजयंतीच्या पावन पर्वावर समाजातील एका लढवय्या पत्रकाराचा सन्मान झाल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री रमेश पाखड, व्याख्याते अनिस रायगडचे प्रधान सचिव श्री महेंद्र पाटेकर, डॉ भगवान लोखंडे, डॉ दत्ता कुंटेवाड, श्री प्रकाश गायकवाड, वाशी हवेलीचे मा सरपंच श्री जगन्नाथ तांडेल, गायमुख ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, पदाधिकारी व सभासद, मुंबई मंडळाचे उपाध्यक्ष, सचिव व कार्यकारिणी सभासद, महिला मंडळाच्या अध्यक्षा, सचिवा व कार्यकारिणी सभासद, गायमुख बौद्धजन सेवा संघ ग्रामस्थ मंडळाची कार्यकारिणी व सभासद, पंचशील महिला मंडळाच्या अध्यक्षा सचिवा व कार्यकारिणी सभासद व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी 'इकबाल शेख' यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी, अहिल्यानगर येथील एनटीव्ही मराठी न्यूज चॅनलचे मुख्य संपादक, इकबाल शेख यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.



कोल्हापूर येथे संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष राजा माने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.इकबाल शेख हे गेल्या तब्बल २८ वर्षांपासून विदर्भ,मराठवाडा आणि खानदेश या विभागांत वरिष्ठ पत्रकार म्हणून कार्यरत असून,डिजिटल माध्यम क्षेत्रात त्यांनी भक्कम ओळख निर्माण केली आहे.

पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी असलेली त्यांची तत्परता,संघटनात्मक बांधिलकी आणि नेतृत्वगुण लक्षात घेऊन त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना ही देशातील डिजिटल क्षेत्रातील एक अग्रगण्य संघटना मानली जाते. महाराष्ट्रासह गोवा,कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात संघटनेचे जाळे विस्तारलेले आहे. संघटनेच्या विस्तारासाठी आणि बळकटीसाठी इकबाल शेख यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. निवडीनंतर बोलताना इकबाल शेख यांनी डिजिटल मीडिया क्षेत्रातील पत्रकारांच्या हक्क,सुरक्षितता आणि सन्मानासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.त्यांच्या निवडीमुळे पत्रकारिता क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध राजकीय,सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. डिजिटल मीडियाच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर अनुभवी नेतृत्व मिळाल्याने संघटनेची ताकद महाराष्ट्रभर अधिक वाढेल,असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला.


# सिल्लोड ग्रामीणमध्ये 'यमदूत' सुसाट!

## अल्पवयीनांच्या हाती दुचाकी की मृत्यूचा परवाना? पालकांनो, वेळीच सावध व्हा!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** :- तालुक्यातील ग्रामीण भागात सध्या अल्पवयीन मुलांच्या हाती दुचाकी सोपवण्याचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. कायद्याचे ज्ञान नसलेले आणि केवळ वेगाच्या मोहात पडलेले हे 'बाल' चालक केवळ स्वतःचाच नव्हे, तर रस्त्यावरून चालणाऱ्या निष्पाप पादचाऱ्यांचा जीवही धोक्यात घालत असल्याचे भीषण वास्तव समोर येत आहे. या गंभीर बाबीकडे वेळीच लक्ष न दिल्यास तालुक्यात एखादा मोठा अनर्थ घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

तालुक्यातील अनेक गावांत १५ ते १७ वयोगटातील मुले विनापरवाना आणि विनाहेल्मेट दुचाकी चालवताना सर्रास आढळत आहेत. शाळा-महाविद्यालयांच्या सुटण्याच्या वेळेत या मुलांचा रस्त्यावरील वावर अधिक असतो. विशेष म्हणजे, गाड्यांचे सायलेन्सर बदलून कर्णकर्कश आवाज काढणे आणि वेड्यावाकड्या




पद्धतीने गाड्या पळवून 'स्टंटबाजी' करणे हे या मुलांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. ग्रामीण भागातील अरुंद रस्ते आणि वस्ती भागातून अचानक समोर येणारे नागरिक यामुळे अपघाताचा धोका पावलोपावली जाणवत आहे.

मोटार वाहन कायद्यानुसार १८ वर्षांखालील मुलाला वाहन चालवण्यास देणे हा गंभीर आणि दंडनीय गुन्हा आहे. असे असतानाही अनेक पालक केवळ मुलांच्या हट्टापायी किंवा घरगुती कामांसाठी त्यांच्या हाती गाड्या सोपवत आहेत. अपघाताच्या प्रसंगी विनापरवाना चालकामुळे विम्याचा लाभही मिळत नाही आणि पालकांना कायदेशीर कचाट्यात अडकण्याची भीती असते, याची जाणीव पालकांना नसल्याचे दिसून येत आहे.

रस्त्यावरील ही जीवघेणी 'स्टंटबाजी' वेळीच रोखणे गरजेचे झाले आहे. केवळ अपघात घडल्यानंतर जाग येण्यापेक्षा, पोलीस प्रशासन आणि आरटीओ विभागाने शाळांच्या परिसरात अधूनमधून विशेष तपासणी मोहीम राबवल्यास या प्रकाराला आळा बसू शकतो. तसेच, पालकांचे समुपदेशन करणे ही काळाची गरज बनली आहे.

सध्या ही बाब केवळ 'हौस' म्हणून पाहिली जात असली, तरी वेगाच्या नशेत अनेक तरुण कायमचे अपंग झाले आहेत किंवा काळाच्या पडद्याआड गेले आहेत. त्यामुळे सिल्लोड ग्रामीण भागातील या वाढत्या 'बाइकिंग कल्चर'वर वेळीच लगाम लावणे ही सामाजिक गरज बनली आहे.

# आगामी सण–उत्सवाच्या अनुषंगाने पो .स्टे . हद्दीतुन पिस्टल (अग्निशस्त्र), ०३ जिवंत काळतूस मॅगझीनसह जप्त

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : गोंदिया शहर पोलीसांची कामगीरी आगामी सण-उत्सवाच्या अनुषंगाने गोंदिया शहर पोलीस पथकाला गोपनीय बातमीदाराकडुन माहीती मिळाली कि, महाकाल मंदीर, पांगोली घाट गोंदिया परिसरात एक ईसम त्याचे जवळ पिस्टल (अग्नीशस्त्र) बाळगुन फिरत आहे. मिळालेल्या माहीतीची पळताळणी कामी पांगोली घाट गोंदिया येथे पोलीस पथकासह जावून खात्री केली असता एक इसम हा महाकाल मंदीर समोर संशयितरित्या फिरतांनी दिसला त्या इसमास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव अमित कृष्णा राव, वय ३९



वर्षे, रा. रेल्वे हॉस्पीटल जवळ, साऊथ कॉलोनी, गोंदिया ह.मु. नारायण नगर कुडवा, गोंदिया असे सांगितले. पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेला मागील बाजुस शर्टच्या आत एक पिस्टल (अग्नीशस्त्र) ०३ जिवंत काळतुस मॅगझीन सह मिळुन आल्याने नमुद आरोपीविरुध्द फिर्यादी सफौ/कवलपालसिंग भाटीया, ब.नं. १४३, पो.स्टे. गोंदिया शहर यांचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन गोंदिया शहर येथे दि. १९/०२/२०२६ रोजी अप.क्र. १५७/२०२६ कलम ३,२५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि/अनिल डॉगरवार पो.स्टे. गोंदिया शहर हे करीत आहेत.

सदरची कामगीरी श्री. गोरख भामरे, पोलीस अधिक्षक, गोंदिया, श्री. अभय डोंगरे, अपर पोलीस अधिक्षक गोंदिया, श्रीमती रोहीणी बानकर, उपविभागीय पोलीस अधिकारी गोंदिया यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन गोंदिया शहरचे पोलीस निरिक्षक श्री किशोर पर्वते, डी.बी. पथकाचे पोउपनि/अनिल डोंगरवार, सफौ/कवलपालसिंग भाटीया, पोहवा/सुदेश टेंभरे, प्रमोद चव्हाण, सतिश शेंडे, दिपक राहांगडाले, निशिकांत लॉदासे, पोशि/सुभाष सोनवाने, मुकेश रावते, अशोक रहांगडाले, दिनेश बिसेन, कुणाल बारेवार प्रमोद शेंडे यांनी केली आहे.

# सणसर येथे गाडगे महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : सणसर (ता.इंदापूर ) येथे धोबी समाजाच्या वतीने संत गाडगे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील प्रमुख मंडळी,समाजबांधव व युवकांनी एकत्र येऊन हभप संतोष महाराज काळे यांच्या कीर्तन सेवेने कार्यक्रमाची सुरुवात केली.कार्यक्रमात संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस



पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी सरपंच यशवंत नरुटे पाटील माजी सरपंच पांडुरंग निंबाळकर विजय पाटील पार्थ निंबाळकर युवा नेते सागर भोईट शंभूराजे निंबाळकर ग्रामसेवक श्री सचिन पवार विहिप तालुका अध्यक्ष बजरंग रायते पुणे जिल्हा वडार समाज अध्यक्ष दिपक माने सणसर भवानीनगर परिसरातील सकल परिट समाज बांधव उपस्थित होता.ज्येष्ठांनी त्यांच्या कार्याची आठवण करून दिली. गाडगे महाराजांनी आयुष्यभर स्वच्छता समाजप्रबोधन आणि अंधश्रद्धा निर्मूलन यासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख करून उपस्थितांना प्रेरणा दिली.

धोबी समाजाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. गावात स्वच्छता मोहीम राबवून गाडगे महाराजांच्या विचारांचा प्रत्यक्ष अवलंब करण्यात आला कार्यक्रमाच्या शेवटी समाजातील तरुणांनी "गाडगे महाराजांचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत"असा संदेश देत पुढील पिढीला त्यांच्या आदर्शांचा वारसा जपण्याचे आवाहन सरपंच यशवंत पाटील यांनी केले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# कु. कृतिकाभोसलेच्या प्रामाणिकतेसमोर दीड लाखांची किंमतही ठरली लहान; लेकीने जपला आई-वडिलांच्या संस्कारांचा मान!



**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी**

> **"कृतिकाने अंगठी परत केली, पण प्रत्यक्षात तिने आपल्या आई-वडिलांनी दिलेल्या संस्कारांचीच परतफेड केली आहे. एवढ्या मोठ्या किमतीची वस्तू समोर असताना तिच्या मनात क्षणभरही लालसा आली नाही. अशी लेक प्रत्येक घरात जन्माला यावी, अशी भावना मनात दाटून येते."**
> **अभिजीत डुकरे**

सारोळे खुर्द येथे प्रामाणिकतेचा हृदयस्पर्शी प्रसंग घडला असून एका शाळकरी लेकीने आपल्या कृतीतून संपूर्ण गावाचा अभिमान वाढवला आहे. येथील माजी सरपंच माधवराव भोसले यांची सुमारे दीड लाख रुपये किमतीची सोन्याची अंगठी दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळच्या सुमारास हरवली होती. अंगठी हरवल्याची माहिती गावात पसरताच नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले.गावातील अभिजित डुकरे यांनी तात्काळ व्हाट्सअँप ग्रुपवर माहिती प्रसारित करत अंगठी सापडल्यास परत करण्याचे आवाहन केले. अवघ्या काही तासांतच सुखद बातमी समोर आली.शाळेत शिक्षण घेणारी कु. कृतिका कैलास भोसले हिला ही अंगठी सापडली. एवढ्या मोठ्या किमतीची वस्तू हातात असूनही तिच्या मनात क्षणभरही लालसा निर्माण झाली नाही. तिने तत्काळ मोठ्यांना माहिती देत ओळख पटवून अंगठी माधवराव भोसले यांच्या स्वाधीन केली.कृतिका हिच्या या कृतीबद्दल गावकऱ्यांनी तिचा यथोचित सत्कार करून बक्षीस देत तिच्या प्रामाणिकतेचा गौरव केला. आजच्या मोहाच्या काळात एका लहानशा लेकीने दाखवलेली ही मोठी माणुसकी समाजासाठी प्रेरणादायी ठरली असून, "संस्कार हीच खरी संपत्ती" असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# अविरत बारा वर्षांपासून समीर शेख यांच्याकडून शिवज्योत प्रज्वलित

## शिवनेरी ते सांगवी पाटण २०० किमी पायी शिवज्योत – हिंदू-मुस्लिम एकोप्याचा प्रेरणादायी संदेश

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे** : आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील उच्चशिक्षित युवक समीर शेख गेल्या बारा वर्षांपासून शिवनेरी किल्ला येथून सांगवी पाटणपर्यंत पायी शिवज्योत आणत असून, या उपक्रमातून समाजात एकता, बंधुता व सर्वधर्मसमभावाचा संदेश देत आहेत.

**छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी वारसा**

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी राजे नव्हते, तर आदर्श राज्यकर्ते, कुशल सेनानी व दूरदृष्टी असलेले समाजसुधारक होते. त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हे फक्त राजकीय स्वातंत्र्य नव्हे, तर सामाजिक समतेचे प्रतीक होते. जाती-धर्माचा भेद न करता योग्यतेनुसार सर्वांना संधी देणारी प्रशासन व्यवस्था त्यांनी उभी केली. 'प्रजेचे राज्य प्रजेसाठी' हा




विचार प्रत्यक्षात आणत त्यांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी केली.

२०० किलोमीटरचा अविरत पायप्रवास

यंदाही समीर शेख यांनी ओंकार खिलारे, दादा इरले व गावातील मावळ्यांसमवेत सुमारे २०० किलोमीटरचा पायी प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. एम.एस्सी., बी.एड., एम.एड. असे उच्च शिक्षण घेतलेले समीर शेख उच्च विचारसरणीचे व समाजासाठी समर्पित युवक म्हणून ओळखले जातात.

शिवनेरीवरून प्रस्थान करताना जुन्नर नगरपंचायतीच्या वतीने त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. धामणगाव येथे शिवज्योत पोहोचल्यावर संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी स्वागत करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

हिंदू-मुस्लिम एकोप्याचे जिवंत उदाहरण

यावेळी समीर शेख म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारताना कधीही जाती-धर्माचा भेद केला नाही. अठरा पगड जातींना सोबत घेऊन त्यांनी स्वराज्य निर्माण केले. मी अभिमानाने सांगतो – मी छत्रपतींचा मुस्लिम मावळा आहे."

गेल्या आठ वर्षांपासून समीर शेख हे भैरवनाथ जन्माष्टमी सोहळ्यानिमित्त वाराणसी (काशी) येथून गंगाजल आणत आहेत, तर बारा वर्षांपासून शिवनेरी ते सांगवी पाटण शिवज्योत आणण्याची परंपरा ते अविरतपणे जपत आहेत.

समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम

या उपक्रमात विविध जाती-धर्मातील युवक मोठ्या संख्येने सहभागी होत असून, समाजात एकात्मता, सलोखा व शिवरायांच्या विचारांचा प्रचार-प्रसार होत आहे. हा उपक्रम म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जिवंत वारसा असल्याची भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# सिल्लोडजवळ वऱ्हाडाचा टेम्पो उलटला; महिला ठार

## विजेच्या जिवंत तारांतून पोलिसांनी ३५ जणांना काढले सुखरूप; ९ प्रवासी जखमी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** : जळगाव जिल्ह्यातील शेलगाव येथून श्रीरामपूरकडे लग्नासाठी वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या आयशर टेम्पोला शुक्रवारी (दि. २०) पहाटे ३.३० वाजेच्या सुमारास सिल्लोड-भराडी रस्त्यावरील आंबा फाट्याजवळ भीषण अपघात झाला. चालकाला डुलकी लागल्याने टेम्पो (क्र. एमएच १९ सीएक्स ३२५४) रस्त्याकडेच्या विजेच्या खांबाला धडकून उलटला. या दुर्घटनेत एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, अन्य ९ जण जखमी झाले आहेत. गस्तीवर असलेल्या पोलिसांनी जिवाची पर्वा न करता विजेच्या जिवंत तारा बाजूला सारल्याने ३५ प्रवाशांचे प्राण वाचले.




मिळालेल्या माहितीनुसार, टेम्पोमध्ये ३० ते ३५ प्रवासी, वृद्ध व लहान मुले होती. आंबा फाट्याजवळ अपघात होताच विजेचा खांब तुटून जिवंत तारा टेम्पोच्या बाजूला पडल्या आणि तेथे 'स्पार्किंग' सुरू झाले. याच वेळी परिसरात गस्त घालत असलेले पोलीस अधिकारी रवींद्र ठाकरे, पोलीस कर्मचारी भिकन सतुके व यतीन कुलकर्णी हे अवघ्या ५ मिनिटांत घटनास्थळी धावून आले. प्रवाशांचा आक्रोश ऐकून पोलिसांनी काठीच्या साहाय्याने तत्काळ विजेच्या तारा बाजूला केल्या. सुदैवाने तारांचा स्पर्श टेम्पोला झाला नाही, अन्यथा मोठी जीवितहानी झाली असती.

**मृताची व जखमींची नावे**

या अपघातात रेखाबाई वसंत गोसावी (वय ५५, रा. बोदवड, जि. जळगाव) यांना वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्चना सपकाळ यांनी मृत घोषित केले. जखमींमध्ये सविता शामराव गोसावी (४०), निर्मला अशोक गोसावी (५०), सरूबाई जालिंदर गोसावी (५०), वसंताबाई नामदेव कोळी (६५), ममता दिनकर कोळी (११), साहिल मुकेश सपकाळ (१३), पुरुषोत्तम हिरामण तायडे (११), ब्रम्हा गोसावी (५०), सुरेश बाबुराव गोसावी (४०) आणि प्रमिलाबाई गोसावी (५५, सर्व रा. शेलगाव, जि. जळगाव) यांचा समावेश आहे. गंभीर जखमींना जळगाव जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

चालकाला डुलकी लागल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. या प्रकरणी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून, चालक भास्कर गोसावी याच्यावर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक लहू घोडे पुढील तपास करीत आहेत.

# दिघोरी येथे शिवजयंती उत्साहात साजरी; रक्तदान शिबिरासह विविध कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**दिघोरी प्रतिनिधी :** दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवछत्रपती सामाजिक बहुउद्देशीय संस्था, दिघोरी यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमानिमित्त शालेय विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांची वेषभूषा करून भव्य मिरवणूक काढली. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

यावेळी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान करून शिवजयंतीचे औचित्य साधले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संध्या कुळमते (उपसरपंच) होत्या. उद्घाटक म्हणून ॲड. धनंजय बोरकर उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. अमित कानेकर, समीरजी कोरे, ॲड. निलेश डहाट, पालिकाचंद बिसने सर, सुनील चाळले



यांनी मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष आशीष खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली शेपराव हलमारे, पवन निरगुडे, ब्रास्टीळ खोब्रागडे, निशांत खोब्रागडे, वैशणवी निरगुडे, प्रणाली निरगुडे, अविनाश अलमारे, ईश्वर मेश्राम, पूजा निरगुडे आदी कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला गावातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात शिवजयंती साजरी करून उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव केला.

# नेरे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल तालुक्यातील नेरे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा 82 व्यक्तींनी लाभ घेतला. अदानी फाउंडेशनच्या वतीने आणि नेरे ग्रामपंचायत सदस्य प्रगती फडके आणि सविता चोरघे यांच्या सहकार्याने आणि हर्षदा मांडवकर व विशाखा कांबळे (सामाजिक कार्यकर्ते) यांच्या मदतीने नेरे येथे मोफत




आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा 82 नागरिकांनी लाभ घेतला. यात 69 महिला आणि सात पुरुष, सहा मुलांचा समावेश होता. यावेळी 44 व्यक्तींची मधुमेह चाचणी करण्यात आली. या शिबिराला नेरे ग्रामपंचायतचे सरपंच प्रकाश घाडगे यांनी भेट दिली.

# पत्रकार श्री डी. टी. आंबेगावे यांचा पन्हेळी–गायमुख गावाने केला विशेष सन्मान

**दैनिक युवक आधार**

**तळा, रायगड :** स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून तळा तालुक्यातील पन्हेळी-गायमुख येथे सामाजिक कृतज्ञतेचा सोहळा पार पडला. यावेळी 'प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ' महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा 'सत्य पोलीस टाइम्स'चे मुख्य संपादक श्री. डी. टी. आंबेगावे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक आणि पत्रकारितेतील कार्याबद्दल सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.हा सोहळा गायमुख ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, बौद्धजन सेवा संघ आणि पंचशील महिला मंडळ (पन्हेळी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.श्री. डी. टी. आंबेगावे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारिता क्षेत्रात आपल्या लेखणीच्या माध्यमातून निर्भीडपणे लढा दिला आहे. केवळ बातम्या देणे एवढ्यापुरते मर्यादित न राहता, पत्रकार, त्यांचे कुटुंबीय, गोरगरीब जनता, कष्टकरी वर्ग आणि विद्यार्थ्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या याच ध्येयवादी कार्याची दखल पन्हेळीतील विविध मंडळांनी घेतली. सन्मानपत्रात म्हटले आहे की, " लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारिता क्षेत्रात आपण बजावलेली सेवा व आपले समर्पण खरोखरच कौतुकास्पद आहे. सामाजिक प्रश्नांची जाण आपल्या निर्भीड वृत्तीमुळे समाजात अनेक महत्त्वाचे बदल घडून आले आहेत. आपल्या ध्येयवादी कार्याची दखल घेऊन कृतज्ञतापूर्वकहे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे." अशा भावना सन्मानपत्राद्वारे व्यक्त करण्यात आल्या. शिवजयंतीच्या पावन पर्वावर समाजातील एका लढवय्या पत्रकाराचा सन्मान झाल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री रमेश पाखड, व्याख्याते अनिस रायगडचे प्रधान सचिव श्री महेंद्र पाटेकर, डॉ भगवान लोखंडे, डॉ दत्ता कुंटेवाड, श्री प्रकाश गायकवाड, वाशी हवेलीचे मा सरपंच श्री जगन्नाथ तांडेल, गायमुख ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, पदाधिकारी व सभासद, मुंबई मंडळाचे उपाध्यक्ष, सचिव व कार्यकारिणी सभासद, महिला मंडळाच्या अध्यक्षा, सचिवा व कार्यकारिणी सभासद, गायमुख बौद्धजन सेवा संघ ग्रामस्थ मंडळाची कार्यकारिणी व सभासद, पंचशील महिला मंडळाच्या अध्यक्षा सचिवा व कार्यकारिणी सभासद व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री गुरु तेग बहादुर साहिबजी अर्थात हिंद दी चादर !

धर्म व मानवतेच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या महापुरुषांचे नाव इतिहासात अजरामर होत असते. शीख गुरु परंपरेतील नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिब यांनी धर्म रक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. ज्यांची 'हिंद दी चादर' म्हणजेच 'भारतभूमीचे कवच' अशी अभिमानास्पद ओळख आहे. त्यांनी धर्म स्वातंत्र्य, न्याय आणि सहिष्णुतेच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान म्हणजे भारतीय संस्कृतीतील एक गौरवास्पद अध्याय आहे. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा आदर्श बाळगणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानामुळे धर्म अबाधित राहिला. त्यांच्या या महान बलिदानास 350वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांच्या या बलिदान दिनानिमित्त नांदेड येथे विशेष सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेणारा लेख.

अमृतसरमध्ये एप्रिल 1621 मध्ये शिखांचे सहावे गुरू हरगोबिंद आणि माता नानकी यांच्या कुटुंबात श्री गुरू तेग बहादूर यांचा जन्म झाला. 1664 मध्ये त्यांना गुरू ही पदवी प्राप्त झाली. गुरू तेग बहादूर यांचे मूळ नाव त्यागमल होते. लहान वयातच एका घनघोर युद्धात अतुलनीय शौर्य दाखवल्याबद्दल त्यांना 'तेग बहादूर' असे गौरवाने संबोधले जाऊ लागले. 'तेग बहादूर' म्हणजे 'शूर, तळपती तलवार' होय ! श्री गुरु तेग बहादूर यांनी त्यांच्या नावाप्रमाणेच तळपत्या तलवारीसारखे शौर्य दाखवत धर्म रक्षणाचे पवित्र कार्य केले.

तो काळ क्रूर शासकांच्या राजवटींमुळे धार्मिक-राजकीय संघर्षाचा होता. समाजातील मोठा वर्ग विविध अत्याचारांना बळी पडत होता. धर्म, संस्कृती, श्रद्धा समूळ नष्ट करण्यासाठी अत्यंत वाईट मार्गांचा अवलंब करण्यात येत होता. लोकांचा केवळ छळच नव्हे तर त्यांचे आयुष्य उध्वस्त करण्यात येत होते. बळजबरी करून लोकांचे धर्मांतर करण्याचा मार्ग या क्रूर शासकांनी



अवलंबिला होता. यामुळे सर्वत्र हाहा:कार माजला होता, या साऱ्यांची इतिहासात नोंद आहे. अशा आव्हानात्मक परिस्थितीत श्री गुरु तेग बहादुर शौर्याने अखेरपर्यंत लढले. समाजाची चेतना व संकल्पशक्ती जागवण्यासाठी प्रसंगी बलिदान दिले. औरंगजेबाच्या क्रूर राजवटीला त्यांनी आव्हान दिले. श्री गुरु तेग बहादुर जुलमी राजवटीसमोर झुकले नाहीत. त्यांचा तेजस्वी निश्चय मोडून काढण्यासाठी मुघल राज्यकर्त्यांनी त्यांच्या परिवारासही संपवले व क्रूरतेचा कळस गाठला. तरीही श्री गुरु तेग बहादुर यांचा संकल्प ढळला नाही. अखेरच्या श्वासापर्यंत ते धर्म व मानवतेच्या रक्षणासाठी लढत होते. अखिल मानवजातीला चारित्र्य, सत्य, संयम, करुणेचा संदेश देत ते दिव्य ज्योतीत विलीन झाले. त्यांच्या आदर्शांचे स्मरण करीत आपण आपले आयुष्य घडवावे हाच आपला निर्धार असावा. भारतीय परंपरेतील अशा महान तेजस्वी ताऱ्याची शिकवण आणि बलिदानाचे महत्त्व बालक, तरुण व प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. श्री गुरु तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरु मानले जातात. यानिमित्ताने त्यांच्या शहिदी समागमाचा इतिहास सर्वदूर पोहोचावा यासाठी महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्यांक विभाग व श्री गुरू तेग बहादुर साहिबजी 350 शहीदी समागम राज्यस्तरीय समितीतर्फे राज्यभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.हा शहीदी समागमाचा उपक्रम केवळ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांना श्रद्धांजली नसून गुरु साहिबांची शिकवण, आदर्श आणि त्यांच्या बलिदानाच्या तेजस्वी परंपरेची ज्योत भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा एक सामूहिक प्रयत्न आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचे जीवन निर्भयता, धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवतेसाठी केलेल्या त्यागाचे प्रतीक असून त्यांच्या बलिदानाचे स्मरण करणे आपले कर्तव्य आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या 350 व्या शहिदी समागमानिमित्त नागपूर येथे 7 डिसेंबर2025 रोजी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मानवता, सत्य आणि धर्म रक्षणाचा मार्ग दाखवणारे श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा गौरवशाली इतिहास समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचावा यासाठी जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. नागरिकांनीही या सर्व कार्यक्रमांना अभूतपूर्व प्रतिसाद दिला. येत्या 24व 25 जानेवारी 2026 रोजी नांदेड येथे विशेष सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात श्री गुरु तेग बहादूर साहेबजींच्या शौर्यावर आधारित गीतांचे गायन, अखंड जप तसेच इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्री गुरु तेग बहादूर यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी विविध धार्मिक व सामाजिक संघटनांसह सर्वजण अनेक सामाजिक, प्रबोधनात्मक व जागृतीपर कार्यक्रम आयोजित करत आहेत. यात मॅरेथॉन, रॅली, भक्तीगीत, स्मरणिका प्रकाशन आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.धर्माचे संरक्षक निर्माण करणे हा श्री गुरु तेग बहादूर यांच्या जीवनकार्याचा उद्देश होता. ग्रंथाला गुरु मानावे ही त्यांची शिकवण ! येणाऱ्या पिढ्यांनी त्यांच्या शौर्य व बलिदानाचे स्मरण करून आयुष्य समृद्ध करावे, असे जणू इतिहास आपणा सर्वांना सांगत आहे. त्यांचे तत्त्वज्ञान व त्यांच्या शिकवणीचे पालन करणे हेच खरे धर्म कर्तव्य होय.

# "शिवरायांच्या विचारांनी पेटली युवकांची जाज्वल्य प्रेरणा ; नेतृत्व म्हणजे जनहिताची शपथ" – आशिष धोंगडे

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशिम**: युवकांनी नेतृत्व म्हणजे केवळ पद किंवा प्रतिष्ठा नसून जनतेच्या विश्वासाची आणि जनहिताची मोठी जबाबदारी आहे, याची जाणीव ठेवून समाजाभिमुख दृष्टीकोन स्वीकारला पाहिजे, असे प्रभावी प्रतिपादन अनुभव शिक्षा केंद्र, अमरावतीचे वाशिम समन्वयक आशिष धोंगडे यांनी केले.



वाशिम येथील राजस्थान आर्य कला व श्री एम.के. वाणिज्य व श्री एस.आर. राठी विज्ञान महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ग्राम सावरगाव बरडे येथे 'नेतृत्व विकास आणि संविधानिक मूल्ये' या विषयावर प्रेरणादायी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

मार्गदर्शन करताना आशिष धोंगडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा उल्लेख करत युवकांनी त्यांच्या विचारांतून नेतृत्वाची खरी दिशा घ्यावी, असे सांगितले. "नेतृत्व म्हणजे समाजासाठी समर्पण, जबाबदारी आणि जनतेच्या हितासाठी घेतलेली बांधिलकी होय," असे ठामपणे त्यांनी नमूद केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

भारतीय संविधानातील मूलभूत मूल्यांवर प्रकाश टाकताना त्यांनी समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांचे महत्त्व अधोरेखित केले. संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान हक्क दिले असून महिलांनाही पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, शैक्षणिक व राजकीय अधिकार प्रदान करून समतेचा भक्कम पाया घातला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शैलेश सोनोने होते. यावेळी प्रा. स्वप्निल एस. काळबांडे व प्रा. डॉ. सोनाली कुमरे यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय युवा कोरचे सदस्य निलेश अंभोरे यांनी पर्यावरण संवर्धन आणि वातावरण बदल या विषयावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला प्रा. डॉ. पी. एस. वानखडे, प्रा. मनोहर गोटे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रेरणादायी विचार, नेतृत्वाचे धडे आणि संविधानिक मूल्यांची जाणीव करून देणारी ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरली.

# नगर परिषद, नगर पंचायतींनी ऊर्जा व्यवस्थापनासाठी सौर ऊर्जेवर अधिक भर देणे आवश्यक - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : सौर ऊर्जेसाठी उपलब्ध असलेले संधी लक्षात घेऊन जिल्ह्यातील नगरपालिका नगर पंचायतींनी अधिक सकारात्मक भुमिका घेऊन आपली कार्यालये, पथदिवे यासाठी सौर ऊर्जेचा वापर होण्याच्यादृष्टीने प्राधान्य दिले पाहिजे. याचबरोबर आपआपल्या हद्दीतील क्रीडांगणे अधिक चांगल्या सोयी-सुविधांसह परीपूर्ण केली पाहिजेत, असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नगर परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले.

सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे नगर पालिका प्रशासनासह विविध विभागांची आढावा बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी माजी आमदार टेकचंद सावकर, विविध नगर परिषद व नगरपंचायतींचे नगराध्यक्ष, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी विनोद जाधव संबंधित नगरपालिका व नगरपंचायतीचे मुख्याधिकारी उपस्थित होते.



जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायती क्षेत्रातील पाणीपुरवठा, स्वच्छता, ऊर्जा, घनकचरा व्यवस्थापन, पट्टेवाटप, प्रधानमंत्री आवास योजना, शाळा, आरोग्य व्यवस्था आदींचा त्यांनी आढावा घेतला.

क्रीडांगणे ही आज काळाची गरज आहे. यातूनच भविष्यातील उज्वल खेळाडू घडणार आहेत. यातील काही राष्ट्रीय पातळीवरही खेळू शकतील असा विश्वास नगर परिषद, पालिकांनी दृष्टीपथात ठेवून याला चालना दिली पाहिजे. नागरीकीकरणाच्या प्रक्रीयेत केवळ सांडपाणी दिवाबत्तीच्या सुविधेपुरते मर्यादीत न राहता आपल्या गावाचा कला, साहित्य, सांस्कृतिक विकासाच्यादृष्टीनेही विचार करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. प्रत्येक नगरपंचायत व नगरपरिषद क्षेत्रात किमान तीन ते पाच क्रीडांगणे विकसित करण्यात यावीत. आवश्यकता असेल तर नविन विकास आराखड्यात याचा समावेश केला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

हेल्थ सेंटर, स्वच्छतेसाठी सर्वंकष आराखडा आवश्यक असतो. ज्या ठिकाणी प्रलंबित नळयोजना आहेत त्या पूर्णत्वास नेल्या पाहिजेत. प्रधानमंत्री आवास योजनेसारख्या महत्वपूर्ण कामाला गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जिल्हा वार्षिक योजनेतून नगरपालिकांमध्ये शाळांची गुणवत्ता वाढ, शाळेचे आधुनिकीकरण, शहरी भागातील अंगणवाड्या सक्षम करणे, नागरी आरोग्य केंद्राची निर्मिती, पावसाळ्यापूर्वी सर्व मोठ्या नाल्यांचे खोलीकरण-साफसफाई करणे ही कामे तातडीने हाती घेण्यात आली पाहिजेत. प्रत्येक नगरपालिका नगरपंचायतीमध्ये विकेंद्रीत पाणी पुरवठा योजना, मोहल्ला निहाय छोट्या पाणीपुरवठा योजना तयार करणे, आपत्ती व्यवस्थापन निधी अंतर्गत पूरप्रवण क्षेत्रनिहाय प्रस्ताव सादर करणे, प्रधानमंत्री आवास योजना 2.0 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पट्टेवाटप करणे व सर्वांसाठी घरे उपलब्ध करून देणे या कामाला अधिक प्राधान्य देण्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. प्रत्येक नगरपालिकेने भुयारी गटार योजना, मलनिस्सारण योजनांची कामे प्राधान्याने हाती घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्य परिवहन महामंडळाचाही त्यांनी यावेळी आढावा घेतला. राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस थांब्यावर थांबत नसल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना विनाकारण ताटकळत राहावे लागते. याबाबत पालकमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. सोबत अनेक बसेस मौद्याला थांबत नाहीत. त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. राज्य परिवहन महामंडळाने एसटी बसेसचे व्यवस्थित नियोजन करुन शाळकरी मुली व मुलींना त्रास होणार नाही याबाबत खबरदारी घेण्याचे त्यांनी सांगितले.

# अस्मिता महिला प्रभाग संघाची निर्भीड नारी ! करी कुटुंब सक्षम भारी !! गावाला देई समृद्धीची उभारी !!! हे घोषवाक्य घेऊन उमेद आले सणसरच्या दारी !!!!

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर येथिल अस्मिता महिला प्रभाग संघाच्या वतीने मासिक आढावा बैठकीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पराक्रमी कार्याला अभिवादन करून प्रतिमेचे पुजन केले व पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी प्रभागातील सर्व ग्रामसखी प्रेरिका,बँक लिंकेज,लिपिका,पदाधिकारी यांनी भगव्या रंगाच्या साड्या परिधान केल्या होत्या. बैठकीच्या सुरुवातीला



महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अस्मिता महिला प्रभाग संघाचे वतीने भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी अस्मिता मॉडेल प्रभाग संघाच्या VIS-SION 6 च्या तीन दिवशीय प्रशिक्षणाचा समारोप करण्यात आला.यामध्ये प्रभाग संघाच्या कार्यक्षेत्रातील एकूण 22 महिला ग्रामसंघाचा विविध शासकीय निधीचा विनियोग करण्यासाठी पुढच्या पाच वर्षाचा बिजनेस डेव्हलपमेंट प्लॅन तयार करण्यात आला. पुढील पाच वर्षासाठी प्रभागसंघाने "अस्मिता महिला प्रभाग संघाची निर्भीड नारी!करी कुटुंब सक्षम भारी!!गावाला देई समृद्धीची उभारी!!! हे घोषवाक्य तयार केले.उमेद अभियानाने एकूण 6 टप्प्यात आयोजित केलेल्या या प्रशिक्षणामुळे महिलांना विविध विषयांची सखोल माहिती मिळाली असून याचा त्यांना भविष्यात छोटे छोटे उद्योग उभारण्यात उपयोग होणार आहे.

या कार्यक्रमासाठी उमेद च्या तालुका व्यवस्थापिका राणी ननवरे, सणसर - लासुर्णे चे प्रभाग समन्वयक डी.जे.राऊत, प्रभाग संघ व्यवस्थापिका कविता केकाण,अध्यक्ष कोमल मोरे, सचिव कांचन निंबाळकर, कोशाध्यक्ष वर्षा मोरे,लिपिका काजल खुडे,FLCRP स्वाती लांडगे, ग्रामसखी कामिनी चव्हाण,सुरेखा चव्हाण,रेश्मा चव्हाण, साधना निकम, सुरेखा शिंदे,रोहिणी मोरे, राधिका कदम, वनिता साबळे, गीतांजली खरात, तेजश्विनी निंबाळकर,तेजश्री गायकवाड,सुनीता रुपनवर राणी सांगळे,बँक लिंकेज मनिषा फडतरे फातिमा शेख संचालक अश्विनी पाटील व सदस्य उपस्थित होते.

# मुदखेड तालुका तलाठी संघटनेच्या अध्यक्षपदी विश्वनाथ बोधमवाड यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/प्रकाश गवारे** : महाराष्ट्र राज्य ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संघटना, तालुका मुदखेडची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून तालुकाध्यक्षपदी विश्वनाथ बोधमवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. ही निवड प्रक्रिया बाबुरावजी मुळेकर यांच्या अध्यक्षतेखाली मुदखेड येथे पार पडलेल्या बैठकीत पारदर्शक व उत्साहपूर्ण वातावरणात राबविण्यात आली.महसूल विभागातील कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवणे, तलाठ्यांच्या सेवा-सुविधांबाबत पाठपुरावा करणे तसेच संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे, या उद्देशाने नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. बैठकीदरम्यान संघटनेच्या भावी वाटचालीसंदर्भात विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

नूतन कार्यकारिणीमध्ये तालुकाध्यक्ष म्हणून



विश्वनाथ बोधमवाड, उपाध्यक्ष शंकर वच्छेवार, सचिव गोपाल माने तर कोषाध्यक्षपदी राजू चव्हाण यांची निवड करण्यात आली. सर्व पदाधिकाऱ्यांचे उपस्थित सदस्यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी मंडळ अधिकारी श्रीमती रूपाली जडे, शितल तरटे व अंजली बार्शीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. नूतन कार्यकारिणीच्या माध्यमातून महसूल विभागातील कर्मचारी हितासाठी अधिक सक्षम व संघटित प्रयत्न केले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# सिल्लोडमध्ये २० वर्षीय तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या; आत्महत्येचे कारण अस्पष्ट

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** : शहरातील जय भवानी नगर भागातील आर्यन रवींद्र भालेराव (वय २०) या तरुणाने गुरुवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास राहत्या घरी अज्ञात कारणाने गळफास घेऊन आत्महत्या केली.



घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी त्यास तातडीने उपजिल्हा रुग्णालयात हलविले, मात्र वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्चना सपकाळ यांनी त्यास मृत घोषित केले. या प्रकरणी सिल्लोड शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस शिपाई बारकू तडवी करीत आहेत. आर्यनच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही

# सार्वजनिक मैदानांवर आर्थिक लूट करणाऱ्या बेकायदेशीर टर्फवर कारवाई करा – पत्रकार मित्र असोएसीएशनची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध शहरातील सार्वजनिक वापरासाठी राखीव असलेल्या मैदानांवर काही शाळा, महाविद्यालये तसेच खाजगी संस्था चालकांकडून बेकायदेशीररीत्या फुटबॉल क्रिकेट टर्फ उभारून मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पत्रकार मित्र असोसिएशनचे अध्यक्ष केवल महाडिक यांनी महापालिका व सिडको प्रशासनाला पत्र देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या बेकायदेशीर टर्फवर तासागणिक



रुपये १५०० ते २५०० इतके शुल्क आकारले जात असून, दिवसाला १५००० ते २५०००, तर महिन्याला ५ ते ८ लाखांपर्यंत अवैध कमाई केली जात आहे. सार्वजनिक वापरासाठी राखीव असलेली मैदाने ही स्थानिक मुलं, युवक व खेळाडूंसाठी असताना, त्यावर फी आकारून प्रवेश दिला जात असल्याने गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच हे टर्फचालक मालक हे शासनाला कोणत्याही प्रकारचा महसूल देत नसून शेड उभारण्यासाठी अथवा टर्फ उभारण्यासाठी कोणतीही स्थानिक प्रशासनाची कोणतीही परवानगी घेत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबातील अनेक खेळाडूंना खेळण्याच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहावे लागत आहे. "पैसे द्या आणि खेळा" ही भूमिका स्थानिक खेळाडूंवर अन्यायकारक असून, सार्वजनिक मालमत्तेचे उघडपणे खाजगीकरण सुरू असल्याचा आरोप देखील यावेळी पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे करण्यात आला आहे. ही मैदाने व्यवसायासाठी नव्हे, तर स्थानिक खेळाडू घडवण्यासाठी आहेत. पनवेल महापालिका हद्दीतील युवकांना खेळण्यासाठी फी भरावी लागणे ही अत्यंत लाजिरवाणी आणि चिंताजनक बाब आहे. सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करून सर्व बेकायदेशीर टर्फ हटवावेत, संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि स्थानिक खेळाडूंना मैदानांचा मुक्त व विनामूल्य वापर उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी पत्रकार मित्र असोसिएशनने पत्राद्वारे केली आहे. तसेच १ महिन्यामध्ये याबाबत ठोस कारवाई न झाल्यास पत्रकार मित्र असोसिशनच्या वतीने स्थानिक खेळाडूंना सोबत घेऊन शहरव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# धोरणी मुत्सद्दी राजकारण...

महाराष्ट्रातील 'महाराष्ट्रीयन प्रतिस्पर्धी ' संपवून महाराष्ट्राच्या जनतेचे प्रतिनिधित्व करणारे एकमेव आम्ही आहोत आणि भविष्यकाळातही ते राहोत.... हे आगामी काळाची पावले ओळखून आपल्या पुढच्या पिढ्यांनाही (राजकीय पक्षाच्या ) महाराष्ट्राचे "महाराष्ट्रीयन अस्मितेच्या" नावाखाली नेतृत्व करण्याची संधी उपलब्ध राहावी, तसेच

आगामी काळात प्रतिस्पर्धी ठरू शकणारा एकमेव पक्ष म्हणजे 'शिवसेना' याला महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर "इकडे आड आणि तिकडे विहीर" अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करून केंद्र, राज्य आणि महानगरपालिका यांच्या सत्ताकेंद्रापासून विनासायास पायउतार करण्याची यशस्वी राजकीय खेळी करण्याची दूरदृष्टी आणि मुत्सद्देगिरी या एकंदरीत राजकीय परिस्थितीमध्ये मा. शरद पवार यांनी साध्य आणि सिद्ध केलेली आहे.

तर, सत्तेतला अधिकांश लाभ मिळवण्याच्या राजकीय महत्त्वाकांक्षांना खतपाणी घालणाऱ्या अवाजवी सल्ल्यात आपले खरे हित शोधून, सत्तामोह किंवा पुत्रप्रेम अथवा दोन्हीमुळे व्यापक दूरदृष्टी , पक्षाचे राजकीय - वैचारिक अधिष्ठान, ग्रामीण भागातील संघटन- विस्तार आणि टिकाव यांचा मुत्सद्दी समन्वय साधणे शिवसेनेला जमले नाही.

तुलनात्मक बरोबरीच्या विद्वेषी विचारातून नवे सत्ता समीकरण जुळले तरी ताठ स्वाभिमानाऐवजी सत्तालोलुप लाचारीच्या तडजोडी

कायम त्यांच्या वाट्याला येणार आहेत. माणूस स्वतःच्या मूलभूत तत्त्वांशी तडजोड करून जगू लागला की त्याचा जसा अंतरीक कोंडमारा होतो तशी आगामी काळात वैचारिक पटलावर शिवसेनेची कोंडी होणार आहे. याचे समर्थन करताना शिवसेनाप्रमुख यांनी भाजपने इतरत्र स्थानिक पक्षांशी केलेल्या तडजोडीचा दाखला दिला. मात्र भाजपाप्रमाणे शिवसेना पक्षाचे राष्ट्रीय पटलावर स्थान नाही. ती केवळ महाराष्ट्रातच 'मराठी मनाचा वेध' घेणारी संघटना आहे याचा विसर पडावयास नको होता.

यामध्ये राजकीय कार्यकर्ता म्हणून सर्वाधिक भरडला जाणार तो ग्रामीण भागातला सुरुवातीपासून कार्यरत असणारा शिवसैनिक. तर सर्वाधिक प्रभावी आणि फायद्यात राहणारा घटक असेल तो म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचा स्थानिक नेता व कार्यकर्ता.

भाजपसारख्या पक्षाला विजयी घोडदौडीतून रोखण्याचं काम देशपातळीवर फक्त महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसला करता आले याचे श्रेय श्री. शरद यांना मिळणारच. तसेच धार्मिक कट्टरतेचा सेना-भाजपाला दोष देत, जातीय समीकरणांच्या जोरावर त्यांना शह देण्यात यशस्वी होऊनही जातीयतेचा दोष मात्र त्यांच्या वाट्याला येणार नाही. त्यामुळे आगामी काळात महाराष्ट्राच्याबरोबर देशाच्याही राजकीय पटलावर पवारांनाच गुरु मानन्याशिवाय पर्याय राहणार नाही.

राज्यातील भाजपची अवस्था जिंकल्यानंतरही जगता न येणारी आहे. ताकद आणि नेतृत्व यांचा कुशलतेनं मेळ घालण्यात ते स्पशेल अपयशी ठरले आहेत. मावळत्या मुख्यमंत्र्यांचे ( देवेंद्र) पक्ष अंतरीचे शह-काटशहाचे डावपेच आणि बरोबरच बाह्य फोडाफोडीचा आणि संख्यात्मक जोडाजोडीचा आभासी विजयी उन्माद जबाबदारी सोडून त्यांना अहंकारामध्ये कधी घेऊन गेला हे त्यांनाच कळलं नसावं. त्यामुळे त्यांचा पक्ष संघटनात्मक एकजिनसीपणा पासून दूर जातोय ही बाब त्यांना समजली नाही; म्हणूनच नवनिर्वाचित किंवा जुन्या भाजप पदाधिकाऱ्यांपैकी कोणीही शिवसेनेचे मन वळविण्यासाठी भरीव प्रयत्न केलेला दिसले नाही.

तसेच भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वालाही महाराष्ट्रामध्ये नियुक्त केलेल्या मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्ष यांच्या माध्यमातून सत्ता चालवणे तितके सोपे व सहज शक्य नाही याची जाणीव निश्चित झाली असणार. जनाधार असणारे, लोकनिर्वाचित प्रतिनिधींना टाळणे घातक ठरू शकते हे महाराष्ट्राचे पुरोगामित्व भाजपाच्या लक्षात आले असेलच.

शेतकरी व सर्वसामान्यांमध्ये निर्माण होऊ लागलेली त्यांची (राजकीय) पक्षीय ओळख कमकुवत पडून तो 'शेटजी-भटजींचा' पक्ष म्हणून मागच्याच वळणावर परत फिरवण्याच्या संधीचे सोने करण्यात शरद पवारांना मोठ्या प्रमाणात यश आले.

राष्ट्रपती राजवटीनंतर राज्यात निवडणुका झाल्या तर महाराष्ट्रातील जनता एक उत्तम पर्याय म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसची विचार करील हा राजकीय दूरदृष्टीचा विचार डोळयासमोर ठेवूनच शरद पवार यांनी इतर पक्षांसोबत वाटाघाटीचे स्वरूप अतिउत्साही, एककली, टोकाचे कुठेच होऊ दिलेले नाही. किंबहुना अगदीच अंतिम पर्याय म्हणून 'भाजपसोबत राजकीय सत्ता' राज्यातील जनतेवर फेरनिवडणुका लावणे टाळण्यासाठी आम्ही स्वीकारली.. असे म्हणण्याचा मार्गही त्यांनी अध्याप पुर्णपणे बंद केलेला नाही..!

माननीय राज्यपाल यांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून, प्रसिद्धी माध्यमांसमोर बोलताना शिवसेना पक्षप्रमुख यांना या घटनात्मक पदाच्या प्रतिष्ठा आणि सन्मानाचा तसेच राजकीय पटलावरील स्वतः ची स्थिती आणि प्राप्त असलेल्या

समर्थनाच्या दाव्याबद्दलच्या ( अधिकृत पाठिंबा अद्यापही प्राप्त नाही) वास्तविकतेचा पण विसर पडला होता. मात्र त्याचवेळी मा. राज्यपाल यांच्या विषयी भाष्य करताना कोणताही शब्द घसरू न देण्याचे कसब शरद पवार यांनी राखले. एकंदरीत या ' सत्ता रस्सिखेच आणि राष्ट्रपती राजवट' प्रकरणात ' ज्यांच्या नावांवर, ज्यांच्यासाठी हे सर्वकाही आम्ही करत आहोत त्या सर्वसामान्य शेतकऱ्यांचा मात्र सर्वांना ( राजकारणी, राज्यकर्ते आणि प्रसिद्धी माध्यमे किंबहुना चाकरमाने ) विसर पडला. आणिव्यापक दूरदृष्टी, राजकीय परिपक्वता आणि धोरणात्मक मुत्सद्देगिरी यांचे क्रियाशील उदाहरण शरद पवार यांनी दाखवून देत सर्वश्रेष्ठ राजकारणी आणि राजकारण सिद्ध केले.

**महेंद्र रंजना उत्तम शिंदे**

# ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली रिसोड पोलिसांची धडाकेबाज कामगिरी; 4 अपहरण गुन्हे उघड

**दैनिक युवक आधार**

**रणजीतसिंह ठाकुर/रिसोड तालुका प्रतिनिधी :** महाराष्ट्र पोलीस दलांतर्गत रिसोड पोलीस स्टेशनने विशेष शोध मोहिम राबवत अपहरण व बेपत्ता प्रकरणांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मागील १५ दिवसांत अपहरणाचे ४ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून, मिसिंग असलेल्या एकूण ६ पुरुष व महिलांचा शोध घेऊन त्यांना नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूप देण्यात आले आहे.

वाशिम जिल्हा पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक श्री. अनुराग तारे यांच्या आदेशानुसार व संकल्पनेतून "ऑपरेशन मुस्कान" अंतर्गत अपहरण व हरविलेल्या बालकांच्या शोधासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली.दि. ११ जानेवारी २०२६ रोजी फिर्यादी सौ. कमल आत्माराम भुगळे, रा. निजामपूर, ता. रिसोड यांनी त्यांच्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या अपहरणाबाबत रिसोड पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. सदर गुन्ह्याचा तपास करून संबंधित मुलीचा शोध घेण्यात आला असून तिला राज्य कर्नाटक येथून ताब्यात घेऊन नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले.

दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी फिर्यादी भागूबाई नाथा पारवे, रा. लोणी खुर्द यांनी त्यांच्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या अपहरणाबाबत तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी तपास करून सदर मुलीचा शोध राज्य मध्यप्रदेश येथील डबरा येथून घेऊन तिला सुखरूप नातेवाईकांच्या ताब्यात दिले.तसेच दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी फिर्यादी जानुमिया बालकीसम राठोड, rा. शिवाजीनगर, रिसोड यांनी त्यांच्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलाच्या अपहरणाची तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी तपास करून संबंधित मुलाचा शोध जिल्हा बुलढाणा येथील सुलतानपूर येथून घेऊन त्याला नातेवाईकांच्या स्वाधीन केले.

दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी फिर्यादी नर्मदाबाई शरीफ खा पठाण, रा. बडकी यांनी त्यांच्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या अपहरणाबाबत तक्रार दिली होती. पोलिसांनी तात्काळ तपास करून संबंधित मुलीचा शोध नागरदास भाग, जि. वाशिम येथून घेऊन तिला नातेवाईकांच्या ताब्यात दिले.तसेच रिसोड पोलीस स्टेशन हद्दीतून मिसिंग झालेल्या एकूण ६ पुरुष व महिलांचा शोध घेऊन त्यांना सुखरूप नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यांचा तपास करताना रिसोड पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक



विश्लेषण व आधुनिक तपास पद्धतींचा वापर करून गुन्हे उघडकीस आणले.

सदर कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री. अनुराग तारे, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड, तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा नवनीच अप्पल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.या कारवाईत पोलीस स्टेशन रिसोडचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन पाटील, पोलीस उपनिरीक्षक डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक संजय वानखेडे, हेड कॉन्स्टेबल संदीप तिडके, पोलीस जमादार आशिष पाठक, महादेव वडगावकर, मंगेश मालवे, संतोष आवळे, सुरेश येवले, पोलीस कॉन्स्टेबल अमित राठोड, योगेश मस्के, गणेश होळे, विनोद मस्के, बबलू पठाण, अमोल होळे, माणिक जुंघारे व सुनील तिवाले यांनी परिश्रम घेतले.

रिसोड पोलिसांनी राबविलेल्या या विशेष मोहिमेमुळे अपहरण व बेपत्ता प्रकरणांचा यशस्वी तपास होऊन संबंधितांना सुरक्षित परत आणण्यात महत्त्वपूर्ण यश मिळाले असून, या कामगिरीबद्दल पोलीस दलाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

**ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांचे अभ्यासू व परिणामकारक नेतृत्व**

रिसोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी सदर प्रकरणांमध्ये अभ्यासू वृत्ती, तपासातील बारकावे ओळखण्याची क्षमता व प्रभावी नेतृत्वाचे दर्शन घडविले. त्यांनी स्वतः तपासाचा सातत्याने आढावा घेत पथकाला आवश्यक सूचना व दिशा दिल्यामुळे अल्पावधीत अपहरण व बेपत्ता प्रकरणांचा उलगडा करण्यात यश आले. त्यांच्या सकारात्मक व कर्तव्यदक्ष नेतृत्वामुळे रिसोड पोलीस स्टेशनची कामगिरी अधिक सक्षम व प्रभावी ठरली आहे.

# जनगणना २०२७ साठी मोठी संधी! वाशिममध्ये १५ कंत्राटी पदांसाठी २४ फेब्रुवारीला थेट मुलाखत

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशिम :** आगामी जनगणना २०२७ चे कामकाज सुरळीत, अचूक व प्रभावीपणे पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने कंत्राटी तत्त्वावर तांत्रिक मनुष्यबळाची भरती करण्यात येणार आहे. एकूण १५ पदांसाठी २४ फेब्रुवारी २०२६ रोजी वॉक-इन-इंटरव्ह्यू आयोजित करण्यात आला आहे.

टेक्नीकल असिस्टंट पदासाठी १४ जागा उपलब्ध असून मासिक मानधन २५ हजार रुपये राहणार आहे. कोणत्याही शाखेतील पदवीधर उमेदवारांना अर्ज करता येणार असून इंग्रजी व मराठी टायपिंगचे आवश्यक वेग, एमएस-सीआयटी उत्तीर्ण प्रमाणपत्र आणि किमान एक वर्षाचा शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील डेटा एन्ट्रीचा




अनुभव आवश्यक आहे. डिजिटल ॲप्लिकेशन हाताळण्याची क्षमता, उच्च शिक्षण व संगणक विषयक अतिरिक्त पात्रता असणाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे.मल्टी टास्किंग स्टाफ पदासाठी १ जागा असून मासिक मानधन १८ हजार रुपये राहील. या पदासाठी किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी तसेच संबंधित अनुभव व उच्च शिक्षण असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार आहे.ही नियुक्ती १८ महिन्यांच्या कालावधीसाठी तहसील कार्यालय तसेच नगर परिषद कार्यालयात करण्यात येणार आहे.इच्छुक व पात्र उमेदवारांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथील राजस्व सभागृहात थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. उमेदवारांनी मुलाखतीस येताना मूळ कागदपत्रे, त्याच्या छायांकित प्रती व पासपोर्ट आकाराचा फोटो सोबत आणणे आवश्यक आहे. दुपारी १ नंतर येणाऱ्या उमेदवारांचा तसेच ई-मेल किंवा पोस्टाद्वारे प्राप्त अर्जांचा विचार करण्यात येणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सेतू समितीचे सदस्य सचिव विश्वनाथ घुगे यांनी दिली आहे.

# महाअंनिस तर्फे शिवरायांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**नागपूर दक्षिण/नागपूर :** रयतेचे राजे,हिंदवी राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची 496 वी जयंती मोठ्या उत्साहात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती च्या वतीने साजरी करण्यात आली. सामाजिक न्याय विभागाच्या गोलघुमट सभागृहात आयोजित या जयंती उत्सवाच्या अध्यक्ष स्थानी जिल्हा कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे होते तर प्रमुख अतिथ्य अंनिसच्या विभागीय सदस्या विजयाताई श्रीखंडे यांनी स्विकारले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या छायाचित्राला माल्यार्पण




केल्यानंतर सर्व मान्यवर कार्यकर्त्यांनी छत्रपतींना पुष्पवंदन केले.त्यानंतर कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा.डॉ सुनील भगत यांनी मांडली. पुढे त्यांनी जयंतीनिमित्त संबोधन करतांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा विस्तृत आढावा घेतांना छत्रपती रयतेचे जाणते राजे कसे होते याचे वर्णन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात चित्तरंजन चौरे म्हणाले की 1869 सारी महात्मा फुले यांनी झाडीझूडपात लपलेली शिवरायाची समाधी गडावर शोधुन काढली, स्वच्छ केली व फुलें वाहिली व तेव्हा पासून शिवरायांच्या जयंती उत्सवाला सुरुवात झाली. ते पुढे म्हणाले की जनमानसात शिवरायांची प्रतिमा रुजविण्याचे व त्यांचे रयतेप्रती असलेले पालकत्व जयंती उत्सवाद्वारे समाजात स्थापित करणेचे खरे श्रेय महात्मा फुले यांना जाते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वसंता माहिले यांनी मानले.

कार्यक्रमाला देवयानी भगत, प्रा पुष्पा घोडके,वंदना मेंढे,मंगला गाणार,माही मोहीले,संगीता मेहर, इंदू उमरे, रेखा रंगारी, मिनाक्षी शंभरकर,वर्षा टेंभेकर,शोभा पाटील,माया सुखदेवे, देवानंद बडगे, अविनाश सुखदेवे,उमेश चित्ते, संकेत वाळके, उत्तम सालवनकर, डॉ विकास होले,इंजि.गौतम पाटील,इ मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळा महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या प्रमुख उपस्थितीत एनएससीआय डोम वरळी मुंबई येथे संपन्न झाला. या प्रसंगी राज्यपालांच्या हस्ते पर्यावरण क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रतिनिधिक स्वरूपात सन्मानित करण्यात आले. यावेळी माझी वसुंधरा अभियान हे पर्यावरण रक्षणाचे दैवी कार्य असून यात सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी गांभीर्यपूर्वक प्रयत्न केल्यास विकसित भारताचे लक्ष गाठता येईल तसेच भावी पिढ्यांकरिता सुरक्षित वसुंधरा निर्माण करता येईल असे राज्यपालांनी सांगितले.प्रसंगी राज्यपालांच्या हस्ते माझी वसुंधरा अभियानातील यशोगाथांवर आधारित "कॉफी टेबल बुक" आणि "द क्लायमेट चेंज लेक्सिकॉन" या मराठी-इंग्रजी पर्यावरण



शब्दकोशाचे देखील प्रकाशन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम देवेंद्र सिंह तसेच वरिष्ठ अधिकारी व निमंत्रित मान्यवर उपस्थित होते.

# घाटंजीमध्ये शिवजयंतीचा उत्साह; आय.ए.एस. आदिबा शेख यांना 'वीर राजे संभाजी' पुरस्कार प्रदान.!

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी महेश पेन्दोर :** शिवजयंती उत्सव समिती व राजे छत्रपती सामाजिक संस्था, घाटंजी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवजयंती सोहळ्यात हजारो नागरिकांच्या उपस्थितीत आय.ए.एस. अधिकारी कु. आदिबा अशफाक शेख यांना 'वीर राजे संभाजी पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. आर्णी विधानसभा क्षेत्राचे आमदार प्रा. राजू तोडसाम यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला.

यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्ष परेश कारिया, उपाध्यक्ष सोनल ठाकरे, अशफाक शेख, नगरपरिषदेचे सभापती व सर्व नगरसेवक प्रामुख्याने उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना आदिबाचे



वडील अशफाक शेख यांनी मुलीच्या यशाचा प्रवास उलगडला. ते म्हणाले की, "तीन वेळा अपयश आल्यानंतरही जिद्द न हारता आदिबाने चौथ्या प्रयत्नात आय.ए.एस. होऊन दाखवले. पालकांनी मुलांच्या स्वप्नांच्या मागे खंबीरपणे उभे राहिल्यास यश नक्की मिळते."

शिवरायांच्या पुतळ्याची लवकरच उभारणी: आमदार राजू तोडसाम

आपल्या अध्यक्षीय भाषणात आमदार राजू तोडसाम यांनी आदिबाच्या कुटुंबाचे कौतुक केले. तसेच घाटंजी शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश येणार असून, लवकरच पुतळ्याची उभारणी होईल, अशी महत्त्वाची घोषणा त्यांनी यावेळी केली.

भरगच्च कार्यक्रमांनी शहर झाले शिवमय

उत्सवाच्या सुरुवातीला शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. जय जिजाऊ, जय शिवराय अशा घोषणांनी आणि महापुरुषांच्या वेशभूषेतील मुलांनी संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते. दुसऱ्या सत्रात ज्ञानेश बंडगर यांचे 'वारकरी संत परंपरा व शिवरायांचे स्वराज्य' या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान झाले.

मनोरंजनाची मेजवानी आणि बक्षीस वितरण

सायंकाळी शिवतीर्थावर सामान्य ज्ञान आणि वेशभूषा स्पर्धा पार पडल्या. यानंतर 'चला हवा येऊ द्या' फेम भारत गणेशपुरे, प्रवीण तिखे आणि शिवानी यांच्या विनोदी कार्यक्रमाने उपस्थितांना खळखळून हसवले. या कार्यक्रमाने उत्सवाची सांगता झाली.

या सोहळ्याचे प्रास्ताविक दीपक महाकुलकर यांनी केले, तर संचालन राजेश उदार, रुपेश कावलकर आणि कुलदीप डंभारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल खर्चे, अनिल मस्के, राजू गिरी यांच्यासह आयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# युजीसी समता विधेयक तातडीने लागू करावे व ओबीसीं जातीनिहाय जनगणना करा प्रा .रूपेशकुमार श्रीरामवार द्वारे उमरी तहसिलदार मार्फत राष्ट्रपतींना साकडे

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर :** भारतीय समाज रचनेत जाती केवळ सामाजिक ओळख नसून ती संसाधनांच्या वितरणाचे मुख्य तत्त्व आहे. ऐतिहासिक काळापासून ज्ञानावर वर्चस्व असलेल्या समूहानेच सत्ता उपभोगली असून बहुजन समाज मात्र वंचित राहिला आहे, असे परखड मत व्यक्त करत ओबीसी समन्वय समिती, उमरी च्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन तहसिलदार मार्फत राष्ट्रपतींना सादर करण्यात आले.

या निवेदनात प्रामुख्याने युजीसी समता विधेयक तातडीने लागू करावे व ओबीसीं जातीनिहाय जनगणना तात्काळ करण्याची मागणी करण्यात आली आहे. जोपर्यंत नेमकी संख्यात्मक माहिती समोर येत




नाही, तोपर्यंत संसाधनांचे न्याय वाटप होणे शक्य नाही, अशी भूमिका समितीने मांडली. तसेच शिक्षण क्षेत्रातील भेदभाव दूर करण्यासाठी युजीसी समता विधेयक तातडीने लागू करावे, अशी आग्रही मागणीही यावेळी करण्यात आली.अलिकडच्या काळात महात्मा ज्योतीराव फुले यांच्या पुतळ्याच्या विटंबनेच्या घटना घडल्या आहेत. या प्रकरणातील दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी शासनाने व्यापक स्तरावर प्रबोधनात्मक उपक्रम राबवावेत, असेही निवेदनात नमूद केले आहे.

यावेळी ओबीसी, व्हीजेएनटी, एनटी-1, 2, 3 आणि एसबीसी प्रवर्गातील विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी ही संरचनात्मक साखळी तोडणे आवश्यक असून सरकारने आमच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा, असा इशारा समन्वय समितीने दिला आहे.यावेळी उपस्थित ओबीसी समन्वय समिती , सकल बहुजन समाज तथा मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाण चे अध्यक्ष प्रा.दादासाहेब ऊर्फ रूपेशकुमार श्रीरामवार , भिमआर्मी नांदेड जिल्हाध्यक्ष मा.स्वप्नील भोसीकर , मधुकर बोडोड , नदीम बेग ,राजेश वर्मा, फारुख बेग आदी अनेक जण या वेळी उपस्थित होते.

# उपेक्षितांच्या जगण्याला 'अन्न' आयोगाचा आधार!

## बेवारस, भिकारी अन् गरजू महिलांना मिळणार रेशन; अपात्र 'सदन' लाभार्थ्यांना कारवाईचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/छत्रपती संभाजीनगर :** - समाजाच्या मुख्य प्रवाहापासून उपेक्षित राहिलेल्या आणि अन्नासाठी वणवण करणाऱ्या बेवारस व्यक्ती, भिकारी, तृतीयपंथी तसेच पोटासाठी देहविक्रय करणाऱ्या महिलांना आता हक्काचा घास मिळणार आहे. राज्य अन्न आयोगाने अशा वंचितांना तातडीने शोधून त्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत 'अंत्योदय' शिधापत्रिका व मोफत धान्य उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत. या मानवतावादी मोहिमेचा श्रीगणेशा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून होत असल्याची घोषणा आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी संपन्न झालेल्या बैठकीत ढवळे यांनी पुरवठा विभागाचा आढावा घेतला. यावेळी आयोगाचे सदस्य सुभाष राऊत, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रविण फुलारी, सिल्लोडचे पुरवठा निरीक्षण अधिकारी बळीराम मुंडे, सहाय्यक महसूल अधिकारी आशिष औटी




यांची प्रमुख उपस्थिती होती.

**गरजूंना शोधून द्या मायेचा आधार!**

अध्यक्ष महेश ढवळे म्हणाले की, "रस्त्यावर राहणाऱ्या गरजू लोकांना त्यांचे कायदेशीर अधिकार माहीत नसतात. प्रशासनाने संवेदनशीलतेने त्यांचा शोध घेऊन त्यांना रेशन कार्डाच्या माध्यमातून मायेचा आधार द्यावा." या आवाहनाला प्रतिसाद देत, सिल्लोडचे पुरवठा निरीक्षण अधिकारी बळीराम मुंडे यांनी तालुक्यात अशा घटकांचा शोध घेऊन त्यांना तातडीने लाभ मिळवून देण्याची ग्वाही बैठकीत दिली.

**अपात्र श्रीमंत 'लाभार्थी' सावधान!**

एकीकडे गरजूंना न्याय देतानाच, दुसरीकडे अपात्र लाभार्थ्यांना आयोगाने कडक इशारा दिला आहे. ज्यांच्याकडे चारचाकी वाहन, मोठी मालमत्ता किंवा कुटुंबात कुणी शासकीय नोकरीत आहे, अशा व्यक्तींनी नियमानुसार बीपीएल (BPL) व अंत्योदयचा लाभ स्वतःहून सोडावा. अन्यथा, अशा अपात्र लाभार्थ्यांची नावे शोधून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश ढवळे यांनी दिले आहेत. सिल्लोड तालुक्यात बळीराम मुंडे व आशिष औटी यांच्या माध्यमातून या कामाला गती मिळाली असून, आयोगाने या 'प्रशासकीय तत्परतेचे' कौतुक केले.

# आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नांना यश प्रशासक म्हणून सरपंच, पाहणार ग्रामपंचायतचा कारभार

## मुख्यमंत्री ग्रामविकास मंत्री यांच्या निर्णयाचे स्वागत करतानाच आमदार बबनराव लोणीकर यांचे अनेक सरपंचांनी मानले आभार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नामदेव मंडपे :** राज्यासह जालना जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतीच्या मुदत संपल्या होत्या व निवडणूक जाहीर न झाल्यामुळे ग्रामपंचायत वर प्रशासक नेमणे गरजेचे होते या पार्श्वभूमीवर राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना पत्र लिहून तसेच प्रत्यक्षात भेट घेऊन मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीचा प्रशासक म्हणून कार्यभार पाहण्याची संधी सरपंच व त्यांच्या बॉडीला द्यावी अशा प्रकारची मागणी केली होती या मागणीला यश आले असून निवडणुका जाहीर होईपर्यंत प्रशासक म्हणून सरपंच



काम पाहणारा असून त्यासमवेतच उपसरपंच व बॉडीतील सदस्य त्यांना करण्यात येणार असल्याचा महाराष्ट्र सरकारने आदेश काढलेला असून यामुळे प्रशासकीय पातळीवरील अधिकारी ग्रामपंचायतचे प्रशासक म्हणून काम पाहणार नसून सरपंच व त्यांची बॉडी काम पाहणार असल्यामुळे ग्राम विकासाला खऱ्या अर्थाने निवडणुका जाहीर होईपर्यंत कुठलीही बाधा येणार नसून या मुळे सरकारने घेतलेले सर्व निर्णय यांची अंमलबजावणी ग्रामस्थरावर सरपंच करणार असल्यामुळे मुदत संपलेल्या ग्रामपंचायतचे सरपंच व उपसरपंच तसेच सदस्य यांनी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे आभार मानले असून या मुळे ग्रामविकास करत असताना प्रशासक म्हणून प्रशासकीय अधिकारी यांचा लाल फितीचा कारभार नेहमीच आडवा आलेला आहे प्रशासकीय अधिकाऱ्यांना गावगाड्यातील नागरिका म समवेत काम करण्याचा अनुभव नसतो मात्र ग्रामपंचायत म्हणून सरपंचांना गावातील प्रत्येक घटकाचा तंतोतंत अभ्यास असतो या पार्श्वभूमीवर हा निर्णय अतिशय महत्त्वाचा असून खऱ्या अर्थाने जनविकासाच्या कामाला अडथळा येणार नसल्याचे अनेक सरपंचांनी सांगितले आहे

याबाबत सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न कणसे यांनी आमदार बबनराव लोणीकर यांचे आभार मानले असून, मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयाचे स्वागत केले आहे तर खांडवी वाडी चे सरपंच रमेश भापकर आमदार लोणीकरांचे आभार मानत आमदार लोणीकर हे सदैव ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडलेले नेते असल्याचे म्हटले आहेतर श्रीष्टि गावचे सरपंच किरण अंभोरे यांनी आमदार लोणीकरांचे आभार मानताना ग्रामविकासासाठी हा निर्णय अतिशय योग्य असल्याचे म्हटले आहे तर आष्टी गावच्या सरपंच शोभा चंद्रकांत मोरे यांनी मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांच्या या निर्णयाचे स्वागत केले असून आमदार लोणीकरांच्या प्रयत्नामुळेच हे शक्य झाले असल्याचे सांगितले

लोणी गावचे सरपंच गजानन लोणीकर यांनी याबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना प्रशासक म्हणून सरपंचांना संधी दिल्यामुळे गावातील विकास कामातील अडथळे दूर होणार असल्याचे सांगितले

याबाबत अकोली च्या सरपंच पल्लवी ज्ञानेश्वर सोळंके यांनी या निर्णयाचे स्वागत करताना लोणीकर हे नेहमीच ग्राम स्तरावरील सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणीत पाठीशी उभे राहणारे नेतृत्व असून त्यांच्यामुळेच पुढील निवडणुकीपर्यंत काम करण्याची संधी आम्हाला मिळणार असल्याचे प्रसिद्धी पत्रका द्वारे म्हटले आहे तर मंठा तालुक्यातील देवठाणा येथील सरपंच निलावती गणेशराव मोरे यांनी लोणीकरांचे आभार मानताना निवडणुकापर्यंत काम करण्याची संधी मिळाल्याचे समाधान व्यक्त केले वाघाळा येथील सरपंच सुनील कांगणे यांनी या निर्णयामुळे खऱ्या अर्थाने ग्रामविकासातील अडथळे प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्याकडेच काम राहिल्याने येणार नसल्याचे सांगितले

# महाराष्ट्राच्या मातीतील हिरोंचा सन्मान : मे मध्ये 'महाराष्ट्र नायक' पुरस्कार सोहळा

**दैनिक युवक आधार**

**तालुका चिखली प्रतिनिधी/श्री सिद्धार्थ धंदरे** : बी एस एफ बहुद्देशीय संस्था, समाज प्रतिबिंब बहुद्देशीय संस्था व उपेक्षित नायक न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे नाशिक मध्ये मे महिन्यात भव्य दिव्य असें कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्र नायक पुरस्कारार्थी यांच्या जीवनाची माहिति देणारं, त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगणार पुस्तकं वितरित करण्यात येणारं




आहे.

पुरस्काराचे स्वरूप ट्रॉफी प्रमाणपत्र,पुस्तकं असें राहिलं.पुस्तकाचे नावं- टाळ्या थांबतात, संघर्ष चालू राहतो असें आहे.

पुरस्कार सोहळा कार्यक्रम उद्देश कर्तृत्ववान लोकांचा सन्मान आणि सन्मानातून वृद्धाश्रम उभारणे हा आहे. अधिक माहितीसाठी कार्यक्रम मुख्य आयोजक भूषण सरदार 9420621994 वर संपर्क करावा. महाराष्ट्र नायक पुरस्कार सोहळा आयोजन समिति मधील पत्रकार रामभाऊ आवारे,पत्रकार मुकुंद आव्हाड,पत्रकार डॉ. शाम जाधव, पत्रकार अश्विनी पुरी,पत्रकार विष्णू गायकवाड, राजनंदिनी अहिरे,वैशाली सोनवणे,कु. अश्विनी सांगळे,शिक्षिका प्रीती म्हसदे,शंकरराव कन्हेरकर, संजय पाटील,पत्रकार संजय बच्छाव,डॉ. रावसाहेब घोडेराव, योगिता दांडगे,शिक्षक दादाराव सुखधाने,पत्रकार रोशन गव्हाणे शिक्षक सोपान वाघमारे, पत्रकार सुरेखा गांगुर्डे, जयश्री बसते,मनिष मुथा, देविदास सोनवणे सम्पूर्ण आयोजन समिति मेहनत घेत आहे.

# महायुतीत अंतर्गत तणाव; भाजपचा २० महापौर, शिंदे गट ठाण्यापुरता मर्यादित

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांमध्ये महापौर निवड पूर्ण झाल्याने राजकीय चित्र स्पष्ट झाले आहे. भाजपने मुंबई, नवी मुंबई,पुणे, नागपूरसह २० पालिकांवर कब्जा केला असला तरी महायुतीत शिंदे गटाला फक्त ठाणे जिल्ह्यातील तीन पालिका मिळाल्या. भिवंडी-निजामपूरसारख्या ठिकाणी बंडखोर व गठबंधनामुळे शिंदे प्रयत्नांना अपयश आले.निवडणूक पार्श्वभूमीसर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने जानेवारीत पार पडलेल्या निवडणुकांनंतर फेब्रुवारीत महापौर निवडी झाल्या. भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीने २४ पालिका जिंकल्या, तर विरोधकांना केवळ ५ मिळाल्या. ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगरात




शिंदे गटाचे महापौर निवडले गेले, पण भिवंडीत भाजप बंडखोर नारायण चौधरी काँग्रेस पाठिंब्याने विजयी झाले.राजकीय नाट्य व अपवाद भिवंडीत शिंदे गटाने सत्ता घेण्याचा प्रयत्न केला, पण भाजपने काँग्रेसशी हातमिळवणी करून त्यांना धक्का दिला. मालेगावमध्ये इस्लाम पार्टीची नसीरिन बानो शेख महापौर झाल्या, तर वसई-विरारमध्ये हितेंद्र ठाकूरांच्या बहुजन विकास आघाडीने यश मिळवले. काँग्रेसला लातूर, ठाकरे गटाला परभणी मिळाली.

भाजपचे महापौर निवडून आलेल्या महानगरपालिका :

मुंबई, नवी मुंबई, नागपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अकोला, अमरावती, चंद्रपूर, जालना, इचलकरंजी, नाशिक, धुळे, जळगाव, मीरा-भाईंदर, पनवेल, नांदेड वाघाळा, सांगली

शिवसेना शिंदे : ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर

राष्ट्रवादी अजित पवार : अहिल्यानगर

काँग्रेस लातूर

शिवसेना ठाकरे : परभणी

बहुजन विकास आघाडी : वसई

इस्लाम पार्टी : मालेगाव

भाजप बंडखोर : भिवंडी-निजामपूर

# माजी आमदार श्रीकांत देशपांडे घेणार शिक्षणमंत्र्यांची भेट

## वाशीम जिल्हा सामूहिक कॉपी प्रकरण..

**दैनिक युवक आधार**

सध्या चर्चेत असलेले प्रकारण म्हणजेच सामूहिक कॉपी प्रकारण गेल्या काही दिवसात अनेक ठिकाणी प्रकरण अनेक उघडीस येत आहे सध्या विषय म्हणजे सामूहिक कॉपी हा नावाजलेलाच या मध्ये 581विद्यार्थी सामूहिक प्रकरणात ओढले गेले त्या मध्ये माजी आमदार तथा



माजी राज्य मंत्री दर्जा श्रीकांत देशपांडे यांनी शिक्षन मंत्री यांची भेट घेऊ असे सांगितलं त्यांचे म्हणे आहे कि माझा कॉपी मुक्त अभियान या बद्दल विरोध नाहीच आणि राहणार पण नाही परंतु या मध्ये मुळीच चूक नसताना पण भरकले गेलेले विद्यार्थी यांचे भविष्य वाया जाऊ नये या करिता मी शिक्षण मंत्र कडे या बाबत भेट घेणार आहे आणि योग्य तो युक्ती वाद करू असे त्यांनी सांगितले या मध्ये कुठला ही राजकीय हेतू नसून फक्त विद्यार्थी यांचे भविष्य खराब होऊ नये या करिता मी कटीबद्ध आहे असे सांगितले आहे.

# डोंगरगावच्या मातीचा चमत्कार! प्रतिस्पर्ध्यांना चितपट करत सुवर्णासह राष्ट्रीय झेप

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडंगे निफाड तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील डोंगरगावच्या मातीने पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध केली आहे. कोकमठाण येथील आत्मा मालिक कुस्ती केंद्राच्या मल्लांनी राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत दमदार कामगिरी करत सुवर्णपदके पटकावली असून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड निश्चित केली आहे. या यशामुळे डोंगरगाव व विंचूर परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्पर्धेत पै. साई संदीप काकड (डोंगरगाव) याने बेल्ट रेसलिंग (७० किलो) गटात आक्रमक डावपेच राबवत प्रतिस्पर्ध्यांना एकापाठोपाठ एक चितपट केले. अंतिम फेरीत त्याने दाखवलेली ताकद, चपळाई आणि आत्मविश्वास प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाट मिळवून गेला.

तर पै. विशाल वाल्मिक नागरे (डोंगरगाव) याने




मास रेसलिंग (७० किलो) प्रकारात शानदार खेळ करत सुवर्णपदकाची कमाई केली. संतुलन, शक्ती आणि चिकाटीच्या जोरावर त्याने अंतिम लढतीत स्पष्ट वर्चस्व गाजवत राष्ट्रीय स्पर्धेचे तिकीट पक्के केले.या उल्लेखनीय यशामागे केंद्राचे प्रशिक्षक, मार्गदर्शक व पदाधिकारी यांचे नियोजनबद्ध प्रशिक्षण आणि मोलाचे मार्गदर्शन कारणीभूत ठरले आहे. कठोर सराव, शिस्तबद्ध दिनचर्या आणि जिद्दीच्या बळावर ग्रामीण भागातील या मल्लांनी राज्य जिंकून राष्ट्रीय रंगमंचावर झेप घेतली आहे. विंचूर येथील शैनेश्वर महाराज कुस्ती पंच कमिटी, ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी व स्थानिक मान्यवरांनी विजेत्यांचा सत्कार करून अभिनंदनाचा वर्षाव केला. "डोंगरगावच्या मुलांनी राज्य जिंकून राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली, ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# महाशिवरात्री निमित्त आयोजित रक्तदान शिबिराला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ; शेकडो दात्यांचे 'रक्तदान'

**दैनिक युवक आधार**

**जाफ्राबाद प्रतिनिधी/अशोक म्हस्के :** जाफ्राबाद तालुक्यातील बोरगाव मठ येथे महाशिवरात्री यात्रा महोत्सव आणि अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा आणि तरुणांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. अध्यात्म आणि सामाजिक बांधिलकीची सांगड घालत, 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.सकाळी ८ वाजल्यापासून सुरू झालेल्या या शिबिरात तरुणांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी हिरीरीने सहभाग नोंदवला.दरवर्षीप्रमाणे यंदाही बोरगाव मठ येथे महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत करण्यात आला. या धार्मिक उत्सवाचे औचित्य साधून समस्त गावकऱ्यांच्या वतीने बोरगाव मठ, बोरगाव बु., बोरी खु, बोरगाव वाडी गावातील ग्रामस्थांनी भव्यरक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भगवान शिवशंकराच्या चरणी सेवा अर्पण करण्याच्या भावनेने सकाळपासूनच रक्तदात्यांनी शिबीर स्थळी गर्दी केली होती.गावातील आणि परिसरातील अनेक तरुणांनी प्रथमच रक्तदान करून आपला सामाजिक धर्म निभावला

लीलावती ब्लड सेंटर बुलढाणा आणि लोकमान्य



ब्लड बँक यांच्या सहकार्याने हा शिबीर पार पडला.

यावेळी बोलताना आयोजकांनी सांगितले की, "धार्मिक कार्यासोबतच समाजातील गरजू रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासू नये, हाच या शिबिरामागचा मुख्य उद्देश होता. गावकऱ्यांनी दिलेला हा प्रतिसाद कौतुकास्पद असल्याचे मतआयोजकांनी व्यक्त केले." यावेळी लिलावती ब्लड सेंटरचे विशाल राऊत, गजानन घाडगे,संदीप माकोडे,जगन खंदाडे, सुनिल जाधव, वसंता फदाट, गणेश फदाट, देविदास फदाट,प्रमोद पैठने, विकास शिंदे, एकनाथ फदाट, स्वप्नील चव्हाण, राहुल फदाट, सुनील फदाट,हर्षल फदाट,आनंद वाहूळे,आकाश वाघ, दत्ता मुळे, योगेश घाटगे, तुषार फदाट,पवन जाधव,गोपाल जाधव,कृष्णा मुळे, गोपाल काकडे,दिपक घाडगे,विठ्ठल चव्हाण,,संदेश फदाट, समाधान फदाट, शुभम फदाट,परमेश्वर जाधव, दिपक खंदाडे,रवि फदाट, विठ्ठल मुळे यांच्यासह परिसरातील तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.

# बोरखेडी चिचं येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठया उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**जाफ्राबाद प्रतिनिधी/अशोक म्हस्के :** जाफ्राबाद तालुक्यातील बोरखेडी चिंच या गावात दरवर्षी प्रमाणे या वर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या थाटात साजरी केली आहे. गावातील लहान मुलापासून ते वयोवृदापर्यंत सर्वांनी भाग घेतला होता. गावातील तरुण वयोगटातील मुलांनी शिस्तबद्ध नियोजन करून छत्रपती महाराज यांची जयंती चांगल्या प्रकारे साजरी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंती मिरवणूक गावातील मारोती मंदिरापासून सुरवात झाली. या मिरवणूकित छत्रपती शिवाजी महाराज यांची पोवाडे, गाणी लावून तरुणाईने नृत्य करून आनंद व्यक्त केला. ही मिरवणूक गावातील चौका -चौकातुन शेवटी अमोल महादू गायकवाड याच्या घराजवळ थांबली. गावातील सर्व गावाकऱ्यांनी अमोल गायकवाड यांना सांगितले तुम्ही महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा ओट्यावर आणून खुर्चीवर ठेवा. आम्हाला आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करायचे आहे.गावाकऱ्याच्या मते छत्रपती



महाराज यांनी त्यावेळी सर्व बारा बलुतेदार समाजातील मावळे आपल्या सोबत ठेवून राज्य चालवले आहे. त्यानंतर संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान दिले. संविधानाने सर्व समाजातील लोकांना फायदा झाला व आज देश संविधानावर चालत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यावेळी संविधान लिहीत असताना छत्रपती शिवाजी महाराज लोक कल्यानाचे काम करणारे,जनतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य डोळयासमोर ठेवले होते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेनेणे पेरीत होऊन संविधान लिहिलेले आहे. गावाकऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा नावाने घोषणा देऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा तेथे समारोप करण्यात आला. या गावात बौद्ध समाजाचे एक घर आहे. गावातील लोक त्याच्यासोबत प्रेमाने व आपुलकीने वागतात.उपस्थित उत्सव समितीचे अध्यक्ष पांडुरंग भुतेकर, उपाध्यक्ष गणेश गायकवाड, परमेश्वर कडाळे, सुनील गुळवे,प्रमोद गायकवाड,उमेश कडाळे तुषार गायकवाड, रमेश कडाळे,परसराम लोखंडे, उमेश गुळवे,अमोल गायकवाड, महादु कडाळे, सचिन गुळवे, अनंता भोपळे, विजय गायकवाड, संदीप कडाळे, ज्ञानेश्वर गुळवे, उमेश लोखंडे, गणेश गुळवे, दादाराव राऊत, केशव भुतेकर, अवचित कडाळे, भरत गुळवे, भगवान लोखंडे, गजानन बर्डे, गौतम सुतार, गणेश भुतेकर, योगेश गुळवे, पवन मोरे, विष्णू लोखंडे, भागवत भालेकर, एकनाथ गुळवे,हर्षल लकडे, समाधान राऊत इत्यादी होते.